चंदन विचारे



# लॉक डाउन

# लक अप



# लॉक डाऊन लक अप

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# लॉक डाऊन लक अप

चंदन सुभाष विचारे

ई साहित्य प्रतिष्ठान

# लॉक डाऊन लक अप (मुक्तछंद लघुकथा):

**चंदन सुभाष विचारे**

संपर्क : ९६६४५०८६२६.

निवास स्थान : बी . एम . सी . इमारत क्र . सी /४, खोली क्र . १५

सरदार नगर -४, रावळी  कॅम्प फायर ब्रिगेड जवळ,

सायन - कोळीवाडा, मुंबई -४०००३७.

ईमेल : chandanmanse@gmail.com.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

प्रकाशन  : ०७/०७/२०२०



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक  आहे.

# चंदन सुभाष विचारे.



चंदन विचारे हे ई साहित्य परिवारातले लेखक. ते मुंबईमध्ये सायन-कोळीवाडा येथे राहतात. 'गेटवे मेरीटाईम प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीत कस्टमर् सर्व्हिस एक्झिक्युटिव्ह या पदावर कार्यरत आहेत. परंतू मनाने मात्र ते महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांतून आणि दुर्गांतून भटकत असतात. आणि त्यावर लिहीतही असतात.

प्रवासवर्णनपर लेख, प्रेम कथा, ऐतिहासिक विषयांवर लेख लिहितात, कविता व चारोळी करतात. ऐतिहासिक माहिती संकलनाची आवड आहे. त्यांचे लेख 'महाराष्ट्र टाइम्स' व 'सकाळ' या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत असतात. 'सहाण' नावाचा कथासंग्रह 'ई साहित्य प्रतिष्ठान'कडून प्रकाशित झाला आहे.


थिंक महाराष्ट्र या वेब पोर्टलवर कल्याणचा भिडे वाडा आणि शिल्पकार श्री. भाऊ साठे यांचे डोंबिवलीतील शिल्पालय या विषयावर लेख प्रसिद्ध झाले आहेत. प्रतिलिपी, मराठीसृष्टी या वेब पोर्टलवरही त्यांच्या कथा व लेख प्रसिद्ध आहेत.

केवळ लिहीण्यावर ते थांबत नाहीत. ते अनेक मार्गांनी सामाजिक कार्य करत आहेत. ऐतिहासिक वास्तू व वस्तू संवर्धन यांसारख्या उपक्रमांमध्ये सहभागी होतात. ठाणे आणि चिपळूण येथील तोफ संवर्धन मोहिमेत सहभाग, मुंबईतल्या ब्रिटीशकालीन मैलाच्या दगडांचा इतिहास उजेडात आणल्याबद्द्ल किल्ले वसई मोहिम परिवार तर्फे सन्मान पत्र देऊन सन्मानित, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सदर दगडांच्या संवर्धनासाठी हेरिटेज कमिटी स्थापनेत त्यांचा मोठा वाटा आहे.

श्री चंदन विचारे यांची ई साहित्यवर उपलब्ध पुस्तके.

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mayurshikha_chandan_vichare.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sahaan_chandan_vichare.pdf








मनोगत

नमस्कार मंडळी मी चंदन सुभाष विचारे.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून आपण मला आता चांगलेच ओळखत असाल.

या आधी ई साहित्य प्रतिष्ठानतर्फे माझी दोन ई पुस्तके 'सहाण' व 'मयूरशिखा' प्रकाशित झाली आहेत. ती आपण वाचली असतीलच अशी आशा करतो.

सध्या आपला देश कोरोना नामक व्हायरसशी लढतो आहे, त्याचा अधिक प्रसार होऊ नये म्हणून बऱ्याच राज्यात लॉकडाऊन जाहीर केले आहे. अशावेळी घरी बसून काय करायचे हा प्रश्न सगळ्यांनाच भेडसावतो आहे अगदी मलाही आणि म्हणूनच या लॉकडाऊनमध्ये घरबसल्या तुमचा काही वेळ सुखाचा अन् आनंदाचा जावा या उद्देशाने काही लघुकथा मी तुमच्यासाठी पुन्हा एकदा घेऊन आलो आहे.

लेखक या नात्याने माझे हे तिसरे ई पुस्तक तुम्हा वाचकांच्या हाती देत असताना मला अतिशय आनंद होत आहे. या आधी प्रकाशित झालेल्या दोन पुस्तकांइतकाच उदंड प्रतिसाद तुम्ही याहि पुस्तकास द्याल अशी मी आशा बाळगतो .

आपला अभिप्राय माझ्यासाठी खूप महत्वाचा आहे. पुस्तकाच्या सुरुवातीसच मी माझा भ्रमणध्वनी क्रमांक, ई मेल आयडी दिलेला आहे. त्यावर किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून वा जेव्हा केव्हा आपली प्रत्यक्ष भेट होईल तेव्हा आपला अमुल्य अभिप्राय मला आणि ई साहित्य प्रतिष्ठानला जरूर कळवा.

पुन्हा एकदा ई साहित्य प्रतिष्ठानचे मनः पूर्वक आभार .

चंदन सुभाष विचारे

अर्पणपत्रिका

अर्पण पत्रिका

नमस्कार वाचकहो..


दिनांक - ०७.०७.२०१७ रोजी ई साहित्य प्रतिष्ठानतर्फे माझे पहिले वहिले पुस्तक सहाण प्रकाशित केलं होते.

दिनांक - ०७.०७.२०१९ रोजी ई साहित्य प्रतिष्ठानतर्फे माझे दुसरे पुस्तक मयूरशिखा प्रकाशित केले .

पुन्हा एकदा आपणांस कळविण्यास अत्यानंद होत आहे कि माझे तिसरे पुस्तक लॉक डाऊन लक अप हे प्रकाशित होत आहे .

तुम्हा वाचकांच्या उदंड प्रतिसादामुळे आणि प्रेमामुळेच माझ्या लेखणीला बळ प्राप्त झाले आहे आणि म्हणूनच माझे तिसरे पुस्तक मी माझ्या तमाम वाचक वर्गास अर्पण करीत आहे

चंदन सुभाष विचारे


ALL WE HAVE
TO
DECIDE
IS WHAT TO DO
WITH THE
TIME
THAT IS GIVEN
TO US
J.R.R. TOLKIEN
The Fellowship of the Ring

अनुक्रम


1. लॉकडाऊनवाली लव स्टोरी.
2. हरवलेलं नातं
3. परतफेड.
4. राखणदार.
5. बाळ -बाळंतीण (भयकथा)
6. एका लग्नाची गोष्ट - भाग १
6 एका लग्नाची गोष्ट भाग २.
6. एका लग्नाची गोष्ट - भाग ३.
7. श्वास हा तुझा.
8. बाबा.
9. लागीर.
10. क्षण आठवांच्या कुपीतले.

# 1. लॉकडाऊनवाली लव स्टोरी.

लॉकडाऊन सुरु झालं तसं घरी बसून करायचं काय असा प्रश्न बऱ्याच जणांना पडला. काहींकडे वर्क फ्रॉम होमचा पर्याय होता तर काहींकडेवेगवेगळ्या घरगुती एक्टिव्हिटीजमध्ये स्वतःला गुंतवून घ्यायचा, काहींनी कधी नव्हे ते स्वयंपाकघरात स्वतःला आजमावून घरच्यांच्या थेट पोटातून मनात उतरण्याचा प्रयत्न करायचं ठरवलं. काहींनी वर्कआऊटला सुरुवात केली, काही जणांनी रामायण, महाभारत बघत जुन्या आठवणीत रमायचंठरवलं, काहींनी मोबाईलवरच्या गेम्समधे, वेब सिरीज पहाण्यामध्ये स्वतःला गुंतवून घेतलं, काहींनी वारली पेंटींग, पॉट डिजाईनिंग, चित्रकला, हस्तकला, मोडी लिपी ऑनलाईन शिकायचं ठरवलं तर काही जणांनी नुसतेच लोळुन दिवस काढायचे ठरवले. ज्याची त्याची आपआपली तऱ्हा सुरुहोती.

संकेतकडे मात्र बरेच पर्याय होते स्वतःला गुंतवून ठेवण्यासाठी. संकेत कॉमर्स ग्रॅज्युएट होता त्यात त्याने ड्राफ्ट्समनचा कोर्स केलेला. एका नामांकितकंपनीत संकेत

कामाला होता. सुरुवाती सुरुवातीला एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापर्यंत संकेतचं वर्क फ्रॉम होम लॅपटॉपच्या माध्यमातून बऱ्यापैकीसुरु होतं. मग मात्र कामाचा ताण थोडा कमी झाला. आता मात्र संकेतकडे त्याच्या इतर कलागुणांना वाव देण्यासाठी बराच वेळ उपलब्ध होता. संकेत दिसण्याच्या बाबतीत कुठलीही मुलगी पहिल्याच नजरेत प्रेमात पडेल असा अजिबात नव्हता. दिसायला बऱ्यापैकी, मनाने अगदी नितळ, निर्मळ, गोजिरा. त्याच्या याच नितळ निर्मळ मनाला, साध्या सरळ स्वभावाला अनुसरुन त्याचं लिखाण होतं. अतिशय सुंदर विचार त्याच्या लेखणीच्या माध्यमातून पाझरत असत. पोळ्यातल्या मधावाणी मधाळ. त्याने आता लिखाण आणि वाचनाकडे आपलं लक्ष केंद्रित केलं होतं. त्याच्या घरच्यांचं लक्ष मात्र त्याच्या लग्नाकडे लागून राहिलेलं. संकेतची वयाची बत्तीशी उलटली होती. योग्य वयात लग्न व्हायला हवं म्हणून घरच्यांनी सगळ्या नातेवाईकांकडे संकेतच्या जन्मपत्रिकेच्या झेरॉक्स कॉप्या अन् फोटो पाठवलेले, मुंबई, ठाणे परिसरातील अनेक विवाह मंडळात नाव नोंदविलेले. संकेतच्या डोक्यात मात्र सध्या बाहेरचं खाऊन खाऊन वाढलेली ढेरी कमी कशी करता येईल याचा विचार.

एके दिवशी संकेतने मनाशी पक्का विचार केला अन् त्या विचाराला मूर्त स्वरुप देण्यासाठी पहाटे सहा वाजताच तो उठून थेट त्याच्या इमारतीच्या गच्चीवर जाऊन पोहोचला. जोर बैठका, सूर्यनमस्कार आणि इतर जमतील तशा साध्या सोप्या तुरळक प्रकाराने त्याने व्यायामाचा श्रीगणेशा केला. आता रोज सकाळ संध्याकाळ तो गच्चीवर व्यायामासाठी जात असे. उरलेल्या वेळात वाचन, लिखाण आणि इतर घरची कामे आणि आराम.

दिवस भरभर सरत होते. नेहमीप्रमाणे आजही संकेत पहाटे सहा वाजता उठून गच्चीवर हजर. नेहमीचा व्यायाम सुरु होताच. इतक्यात त्याची नजर समोरच्या इमारतीतील गच्चीवर गेली. समोरच्या टेरेस फ्लॅटमध्ये महिन्याभरापूर्वीच एक सुंदर मुलगी रहायला आल्याचं संकेतनी कॉलनीतल्या मुलांकडून Whatsapp वर ऐकलं होतं. आज मात्र तिच्याशी त्याची तिची प्रत्यक्ष नजरभेट झाली.

हिंदी चित्रपटात दाखवतात तशीच प्रेमाची घंटी संकेतच्याही हृदयात तिला पहाताच वाजू लागली. डोक्यात सागर

चित्रपटातील ला रा ला रा लालावाली इंस्ट्रुमेंट सुरु झाली. भिजलेल्या केसांना टॉवेलने पुसत कोवळं ऊन खायला ती घराबाहेर आलेली. तिला पहाताक्षणीच संकेतला " सागर जैसीआँखोवाली ये तो बता तेरा नाम है क्या " हा गाणंरुपी प्रश्न पडलेला. तिने संकेतला पाहिलं, सुरुवातीला थोडंस दुर्लक्ष करीत तिने त्याच्याकडे कानाडोळा केला. पण का कुणास ठाऊक त्याची ती एकटक तिला न्याहाळणारी नजर तिलादेखील कुठेतरी सुखावून गेली होती. स्वतःशीच हसत तीआल्यापावली घरात शिरली.

तशी तिच्यावर फिल्डिंग लावून बसलेल्यांची संख्या कॉलनीत काही कमी नव्हती. शेजारच्या किरणकडून संकेतने तिची माहिती काढली.

तिचं नाव होतं रिद्धी. बीएड झाली होती. अंधेरीच्या एका शाळेत शिक्षिका म्हणून नुकतीच रुजू झालेली. आईवडीलांची एकुलती एक. वडील एका कोऑपरेटीव्ह बँकेत अकाऊंटंट आणि आई महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षिका. आईच्याच पावलांवर पाऊल ठेवत रिद्धीनेहि शिक्षकी पेशा स्वीकारलेला होता. किरणने भराभर सगळी माहिती सांगितली.

आता मात्र संकेतच्या गच्चीवरच्या फेऱ्या वाढल्या. तिची त्याची नजरभेट आता वरचेवर होऊ लागली होती. त्यात ती एके दिवशी कधी नव्हे ते संकेतकडे पहात हलकिशी हसली. मग काय विचारता संकेतला आतल्या आत गुदगुल्या झाल्या. संकेतनेही तिच्या हलक्याशा हासण्याला खुल्या हसूचा परतावा दिला.

संकेतने गच्चीवरनंच किरणला फोन लावला. प्रेम प्रकरणात किरणने पीएचडी केलेली. त्यामुळे त्याचा सल्ला संकेतसाठी लाखमोलाचा. संकेतने किरणला फोन करुन गच्चीवर घडलेली सुखद घटना सांगितली. मित्रांच्या सेवेसी तत्पर असणाऱ्या किरणनेही त्याला दोनचार फुकटचे सल्ले दिले आणि पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कधी नव्हे ती संकेतची गाडी रुळावर यायला सुरुवात झाली होती. या गच्चीवरुन त्या गच्चीवर इशारतीच्या तोफा आता झडायला सुरुवात झाली होती. येनकेन बहाण्याने तीही गच्चीत येऊ लागली होती. हसण्या लाजण्याचे खेळ आता रोजचेच झाले होते. इशाऱ्या इशाऱ्यातूनच एकमेकांच्या मोबाईलनंबरची देवाणघेवाण झाली. संध्याकाळी ठरलेल्या वेळी संकेत गच्चीवर

आला. खिशातला मोबाईल काढत संकेतने तिचा नंबर डायल केला. तिने फोनउचलला नी संकेतच्या कानावर तिचा मधूर आवाज अलगद येऊन विसावला.

रिद्धी - "हॅलो कोण?

संकेत - " मी संकेत समोरच्या गच्चीतून. बाहेर ये ना ! "

तिने हॉलचा पडदा बाजूला सारत नजरेचा कटाक्ष वर टाकला. संकेत समोरच उभा होता. त्याला थांबण्याचा इशारा करत ती बाहेर गच्चीत आली.

पांढरा शुभ्र ड्रेस घातला होता तिने. तिला पहाताच संकेतला चांदनीमधली श्रीदेवी आठवली. मोकळे सोडलेले केस, गोरापान देह त्या पांढऱ्या ड्रेसमधेअधिकच उजळलेला दिसत होता. संकेतला ती स्वर्गीची अप्सराच वाटू लागली होती आता ती.

रिद्धी - " बोल ना काय करतोयस?

संकेत - " तुला पहातोय. खूप गोड दिसतेयस. अगदी नजर हटवूच नये असं वाटतंय. "

रिद्धी - " खरंच एवढी सुंदर दिसते मी?

संकेत - " नुसती सुंदर नाही साजिरी गोजिरी वाटतेयस तू आणि त्यात हा पांढरा ड्रेस तर फारच खुलून दिसतोय तुझ्यावर. "

रिद्धी - " पुरे कौतुक. इतकी आवडते मी तुला?

संकेत - " नुसती आवडत नाहीस तर पार याड लावलंय तुझ्या या गोऱ्या रुपानं मला. इतकं कि आता तु जळी स्थळी दिसायला लागली आहेस. डोळे मिटताक्षणीच स्वप्नात येतेस.

किरणने संकेतला मधल्या काही दिवसांत फुल्ल ट्रेन केलं होतं. तशी तिनेही तिच्या एका मैत्रीणीकडनं संकेतची सगळी माहिती काढली होती. तिच्याकडनंच तिला संकेतच्या लिखाणाबद्दलही कळलं होतं. संकेतचे काही लेख तिने तिला

आधीच व्हॉट्सअपवर पाठवले होते. ते वाचल्यानंतरतर तिला नितळ, निर्मळ मनाचा संकेत आता अधिकच आवडू लागला होता.

रिद्धी - " बोल ना, थांबलास का?

संकेत - " काय बोलू काही सुचतच नाहीय. शब्द ओठांच्या उंबऱ्याशी येऊन घुटमळू लागलेत. विचारु कि नको असं मनातल्या मनात द्वंद्व सुरु झालंयपण धीर करुन विचारतोच. खरं सांगशील?

रिद्धी - " विचार ना त्यात काय एवढं. जे मनात असेल ते सरळ बोलून मोकळं व्हावं माणसानं. "

संकेत - " मी पण तुला आवडतो का?

रिद्धीने थोडंसं लाजत ओठांचे मोहोळ न खोलताच नजरेनेच होकार कळवून टाकला.

आता तर संकेत पार वेडापिसा होऊन नाचायचाच बाकी होता. इतक्या वर्षांची त्याची तपस्या फळाला आली होती. साजिऱ्या गोजिऱ्या चेहऱ्याची एकगोड परी संकेतच्या प्रेमात पडली होती. लॉकडाऊनमुळे बाहेर पडणं शक्य नसलं तरी फोनवरुन आणि गच्चीवरुन संकेतची आणि रिद्धीची भेट आतावारंवार घडत होती. व्हॉट्सअपवर दिवसरात्र चॅटला सुरुवात झाली. फेसबूकवरनं फ्रेंड रिक्वेस्ट सेंट आणि एक्सेप्ट झाली होती. लाईक्स, कमेंट्सचापाऊस आता रोज बरसू लागला होता. दोघेही आता मनापासून वाट पहात होते ते लॉकडाऊन उघडण्याची.

मंडळी तुम्ही म्हणालं एवढी फास्ट लव स्टोरी ! हो का नाही? नजरेचा एक कटाक्ष पुरेसा असतो माणूस ओळखायला अन् प्रेमात पडायला.

---

## 2. हरवलेलं नातं.

आज दुपारपासनंच पावसाने रिपरिप शिडकायला जी सुरुवात केली त्याचं पर्यावसन संध्याकाळपावेतो पार मुसळधार पावसात झालं. मध्येच ढगांचा कडकडाट अन् विजांचा लखलखाट करत वीज आणि ढग दोघे मिळून या मुसळधार पावसाला आपला हातभार लावीत होते. ऑफिसहून घराकडे लवकर परतण्यासाठी चाकरमन्यांची पळापळ सुरु होती. कुणी रेल्वे स्टेशनच्या दिशेने धावत होता, कुणी बस पकडायला, कुणी हात दाखवून टॅक्सी थांबवत होता तर कुणी एका हातात छत्री सावरत आणि दुसऱ्या हाती बॅग धरत -कसरत करत लगबागीने पावलं टाकत घराकडे परतत होता. प्रत्येकाला आता घरी परतण्याची घाई लागली होती. पावसाने सारी वाहतूक सेवा बंद करण्याआधी ज्याला त्याला आपलं घर गाठायचं होतं. रस्त्यावर झालेल्या ट्राफिकमुळे हॉर्नचा गोंगाट सुरु झाला.

रस्तापलीकडील टॉवरमध्ये पंधराव्या माळ्यावर रहाणारा रोहन हे सारं आपल्या बेडरुमच्या बाल्कनीत उभं राहून गरमागरम कॉफी पित पहात होता. इतक्यात रोहनला कसलीशी

आठवण झाली म्हणून तो परत आत गेला, ड्रॉव्हर उघडून आत डोकावून पाहिलं तर सिगारेटचं पाकिट खाली.

रोहनला सिगारेटची तलफ आलेली. त्याने परत बाल्कनीत येत खाली वाकून पाहिले. पानाची टपरी उघडी होती. छत्री घेऊन रोहन तडक खाली गेला, टपरीवाल्याकडून सिगारेटचं पाकिट घेतलं अन् तो रस्ता क्रॉस करणार इतक्यात त्याला काहीतरी आठवलं तसं त्याने मान मागे वळवून पाहिलं. पानटपरीशेजारच्या मेडीकल दुकानाच्या आडोशाला एक सुंदर स्त्री खांद्याला बॅग लावलेली अन् दुसऱ्या हाती भाजीने भरलेली पिशवी घेऊन ती उभी होती. हातात छत्री होती पण वेड्यापिशागत वारा येईल त्या दिशेने कोसळणाऱ्या पावसाच्या सरींनी तिला पुरतं न्हाऊ घातलं होतं. हि भाग्यश्री. रोहनने ओळखलं.

रोहन - " भाग्यश्री अगं तु काय करतेस इथे?

भाग्यश्री- "रोहन तू? तु इथे काय करतोयस? मी ऑफिस-मधून घरी जायला निघाले होते पण या पावसाने बघ ना वाट लावली सगळी. "

रोहन - " तु एक काम का नाही करत? समोरच्याच टॉवरमध्ये मी रहातो. माझ्या घरी चल. चेंज कर आणि पाऊस कमी झाला कि निघ तू. "

रिया - " नाही नको अरे मी थांबते इथेच, पाऊस होईल कमी इतक्यात. "

रोहन - " डोन्ट वरी भाग्यश्री अगं माझ्या घरी माझी बायको मुलगी दोघी आहेत. डोन्ट फिल ऑक्वर्ड. "

काहीसा विचार करत भाग्यश्री रोहनला हो म्हणाली आणि मग दोघेही रोहानच्या घराच्या दिशेने रवाना झाले. रोहनने दारावरची  बेल दाबली. रोहनच्या बायकोने दरवाजा उघडला. आपल्या नवऱ्यासोबत अशा चिंब अवस्थेत आलेल्या परक्या स्त्रीला बघून रोहनची बायको श्रेया जरा चपापलीच पण तिने ते तसं चेहऱ्यावर जाणवू दिलं नाही. रोहनने श्रेयाला भानावर आणत म्हटलं " अगं घरात घेशील कि बाहेरच ताटकळत उभी ठेवशील. "

श्रेया - " ओह आय एम सो सॉरी या ना आत. "

भाग्यश्री घरात येताच रोहनने तिला हॉलमध्येच थांबायला सांगून तो बायकोमागे बेडरुममध्ये गेला. त्याने भाग्यश्रीबद्दल श्रेयाला सगळं सांगितलं आणि श्रेयाला कपाटातनं एखादी साडी काढून भाग्यश्रीला द्यायला सांगितली.

श्रेयानेही मग भाग्यश्रीला आत बेडरुममध्ये बोलावून चेंज करायला सांगितलं.

भाग्यश्री चेंज करेपर्यंत श्रेयाने आत किचनमध्ये जाऊन गरमागरम चहा बनवला आणि हॉलमध्ये चहा बिस्कीटं घेऊन ती येऊन बसली. भाग्यश्री बाहेर येताच श्रेयाने तिला सोफ्यावर बसण्याचा इशारा केला. भाग्यश्री थोडीशी रिलॅक्स होत सोफ्यावर येऊन बसली. रोहनही तिथेच बसला होता त्याच्या बारक्या दोन वर्षाच्या सानिकाला खेळवत. श्रेयाने भाग्यश्रीला चहा घ्यायला सांगितलं आणि मग सुरु झाल्या तिघांच्या गप्पा.

रोहनने कुठूनतरी बोलायला सुरुवात करायची म्हणून भाग्यश्रीला श्रेयाची ओळख करुन दिली.

रोहन - " भाग्यश्री हि श्रेया माझी बायको आणि हि आमची छोटी सानिका आणि श्रेया हि भाग्यश्री माझी शाळेतली बालमैत्रीण कम बहिण.

श्रेया - " हे नविन काय?

रोहन - "अगं म्हणजे शाळेत आम्ही प्राथमिक ते माध्यमिक एकाच वर्गात. आणि त्यात हि माझी एकदम क्लोज. शिवाय शाळेत दरवर्षी रक्षाबंधनलामला वर्गात पहिली राखी हिच बांधायची. किंबहुना तिचा तो हट्टच असायचा कि तुझ्या हातावर कुणी पहिली राखी बांधेल तर ती मीच. "

श्रेया - " ओह ग्रेट. मग पुढे?

रोहन - " पुढे काय कित्येक वर्ष हि रीत अशीच सुरु होती त्यात अजिबात खंड पडत नव्हता. पण एके दिवशी हि अचानक रडत रडत माझ्याकडेआली. आम्ही सातवीत होतो तेव्हा. भाग्यश्रीच्या बाबांची बदलापूरला ट्रांस्फर झाली होती. भाग्यश्रीला बाबांबरोबर बदलापूरला जायला लागणार होतं. आपल्या या शालेय मित्रमैत्रीणींना किंबहुना मला सोडून तिला दूरवर जायला

लागणार होतं म्हणून ती खूप दुःखी झाली होती. मी कसंबंसं समजावलं तिला. "

भाग्यश्री - " पुढचं मी सांगते. बाबांची ट्रांस्फर झाली आणि आम्ही बदलापूरला आलो. तेव्हा हे आतासारखे मोबाईल वगैरे नव्हते. फोनही सगळ्यांच्याघरी नव्हते तेव्हा. मी रक्षाबंधन येण्याआधी पंधरा एक दिवस अगोदरच पोस्टाने रोहनला राखी पाठवत असे. हे असं सगळं सुरुवातीला काही वर्ष चाललं होतं. रोहनही पत्राचे उत्तर पत्र मिळाल्यानंतर सवडीने पाठवत असे पण मग अचानक रोहनच्या पत्राचं उत्तर येणं बंद झालं. मला काही कळायला मार्गच नव्हता. रोहनही कदाचित तेव्हा दहावी पासआऊट होऊन गेला होता. शाळेतल्या कुणाचाच काही संपर्क नाही. मला कळेचना काय झालंय ते. मग मी ही पत्रं पाठवणं बंद केलं. बरीच वर्ष लोटली, माझंही मग कालांतराने लग्न झालं, मी माझ्या संसारात रममाण झाले आणि मग आज अचानक हि अशी पावसाळी भेट. "

श्रेया - " ओह. पण तुला खरं सांगू हा रोहन ना जात्याच आळशी. त्याने तुला संपर्क करायला हवा होता. पण यानेच आळस केला असणार. मला खात्रीआहे. "

सगळे हसले आणि मग रोहननेही कबूल केलं..

रोहन - " खरंच याबद्दल सॉरी भाग्यश्री. त्याचं झालं असंकी काही वर्षानंतर आम्ही देखील आमचं चाळितलं घर विकून शेजारच्याच विभागात एका इमारतीत रुम विकत घेतला आणि त्यावेळी सामानाच्या हलवाहलवीत तुझी पत्र कुठे गहाळ झाली कळलंच नाही. मी मधल्या काळात शाळेतल्याआपल्या वर्गातल्या बऱ्याच जणांना विचारुन पाहिलंही तुझ्याबद्दल पण कुणाकडेच तुझा पत्ता वा घरचा फोन नंबर नव्हता. मधल्या काळात मी फेसबूकवरही शोधून पाहिलं तुला पण तु तिथेही नव्हतीस. मग अचानक एके दिवशी एका कोळी महोत्सवाला मी गेलेलो असताना तुझ्या शेजारी रहाणारी माधुरी नावाची मैत्रीण मला तिथे भेटली. तिला विचारल्यावर तिने तुझा फोटो मला दाखवला आणि तु परत मुंबईत शिफ्ट झाल्याचं मलासांगितलं. मी तुझा नंबर तिच्याकडून घेणार तोच तिथे अचानक कुणीतरी मोठ्या राजकीय व्यक्तिमत्वाचं आगमन झालं आणि तु त्यात बिझी झालीसआणि मग तुझा नंबर तिच्याकडून घेणं राहूनच गेलं.

पण हि अशी मनापासनं जोडली गेलेली वर्षानुवर्षांची नाती अशी अचानक तुटत नसतात. शेवटीआज तुझी माझी भेट झालीच ना!"

भाग्यश्री - " मी तर तुझ्या भेटीची आस सोडूनच दिली होती. वाटलंच नव्हतं तु पुन्हा भेटशील म्हणून. नशीब तु ओळखलंस मला. खरंतर आपण यापावसाचे आभार मानले पाहिजे ज्याने आपली हि अशी ग्रेट भेट घडवून आणली. "

श्रेया - " ताई आताच नंबर घेऊन ठेवा एकमेकांचे आणि पत्तेही. म्हणजे काय येत्या रक्षाबंधनला तुम्हाला तुमच्या या भावाला पुन्हा पहिली राखीबांधता येईल.

तिघांचाही आनंद आता गगनात मावत नव्हता. रोहनला कैक वर्षानंतर त्याची हरवलेली बहिण सापडली होती, श्रेयाला नणंद आणि छोट्या सानिकालाआत्या.

---

## 3. परतफेड.

एका आडगावात घडलेली हि कथा..

अलुतेदार - बलुतेदारांनी भरलेलं एक गाव. गाव तसं थोडं आडवाटेला पण गावात शेतीवाडी, गायीम्हशी, जमिनजुमला भरपूर. गावातली लोकंहीसधन. आपआपल्या घरी खाऊनपिऊन सुखी. कुणीबी कुणाच्या उगी धुगीत नाही हा मात्र एकमेकांच्या सुखदुखाःत धावून जाणारी. एकमेकांसउपयोगी पडणारी. गावात सारं काही सुरळीत चाललेलं असतं. नुकताच ग्रामदेवतेचा उत्सव आनंदात, खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेलाअसतो. उत्सवाच्या धामधुमीतनं बाहेर येऊन गावातले गावकरी आता शेतीच्या कामाला लागलेले असतात. ईरल्या, टोपरी, विळे, कोयते, खतं, नांगर,बी-बियाणं साऱ्याची जमवाजमव सुरु झालेली. पाऊस येण्याआधी लोकांनी खोप्यात लाकूडफाटा साठवायला सुरूवात केलेली असते. सारेजण आतुर होऊन पावसाच्या येण्याची वाट बघत असतात.

जून महिना येतो. आकाशात ढगाळ वातावरण होतं, पण ढग बरसतच नाही. पाऊस आज येईल, उद्या येईल, म्हणता म्हणता जून महिना उलटून दुसरा महिना उजाडतो तरी हिच गत. लोकांचे डोळे आभाळाकडे लागलेले, चातकाइतकेच लोकही आतुर पाऊसपाण्यासाठी. पण पावसाची सुखावणारी सर येईचना. वर कोरडं आभाळ आणि खाली भेगाळलेली जमिन. हळूहळू शेत जमिनीला भेगा पडू लागतात, विहीरी, नद्या कोरड्या पडू लागतात, झाडांची पानझड सुरु होते. सुखासमाधानाने नांदणाऱ्या गावावर दुष्काळाचं सावट कोसळतं.

गोठ्यात दावणीला बांधलेल्या गुराढोरांचीही आबाळ. अपुऱ्या चाऱ्याअभावी त्यांचीही उपासमार सुरु झाली. गावकरी तरी काय करणार? आधीच दुष्काळामुळे स्वतःच्या खाण्यापिण्याचे वांदे झालेले, त्यात गुरांची उपासमार म्हणून मग देवाच्या भरवशावर त्यांना दिलं सोडून उघड्या आभाळाखाली. सरकारच्या मिळणाऱ्या तुटपुंज्या मदतीवर कशीबशी लोकांची गुजराण सुरु होती. धनदांडग्यांची त्यातल्या त्यात आधीच बऱ्यापैकी पैशाची, बाजारातून आणलेल्या धनधान्याची आगाऊ साठवण करुन ठेवल्यामुळं थोडीफार चंगळ, पर गरीबाचं हाल

कुतराबी खात नव्हता. घर फिरल्यावर घराचे वासेही फिरतात असं म्हणतात तीच गत गावातल्या माणसांची- त्यांची बुद्धी भ्रष्ट झाली. जो तो आपल्यापुरता विचार करु लागला. शेजारच्या घरात काय हाय न्हाई याचं कुणालाबी काही पडलं नव्हतं. सरकारी मदत यायची पर ती बी तुटपुंजी. पायलीभर मदत आणि मणभर फोटो काढून जायचे सायब लोक. अशाच गरीबीचं अन् दुष्काळाचं चटकं सोसणाऱ्या एका घराची हि कथा..

आज सकाळपासनंच रखमा गावच्या फाट्यावर येऊन बसली व्हती. हि रखमा खालच्या वाडीतली. दिसायला सावळसुंदर पर दारिद्र्यांनं ग्रासलेली. रखमाच्या घरी तिचा नवरा, दोन पोरं आनि सासरा पर त्यो बी जाग्यावर पडलेला. त्येचा जीव कदी जाईल त्ये सांगता यायाचं न्हाई.

गावातल्या प्राथमिक शाळेत शिकवणारे रविंद्र मास्तर त्यांच्या बाईकवरनं कुठंतरी निघालं व्हतं. ते रखमानं पाहिलं तशी ती हात दाखवत गाडीम्होरं आली. तिनं ओळखलान हे मास्तर. ती अशी अचानक गाडीसमोर येताच मास्तरांनी गाडी थांबवली.

मास्तर - " काय गं तु गण्याची आई ना? "

रखमा - " व्हय मास्तर म्याच. "

मास्तर - " काय काम काढलंस नी हे असं गाडीसमोर यायचं कारण?

रखमा - " यक काम व्हतं मास्तर, वाईच पैकं हवं होतं. घरात खायाला काय सुदीक न्हाय. विख घ्यायला सुदिक पैका न्हाई. "

मास्तर - " पैशे देण्यापेक्षा मी तुझ्या घरात महिनाभराचं रेशन भरुन दिलं तर चालेल? "

रखमा - " लई उपकार व्हतील मास्तर लई उपकार व्हतील."

मास्तर निघून गेलं पर रखमा मास्तरांची वाट बघत तथं फाट्यावरच बसून ऱ्हायली. दोन अडीच तासानं मास्तरांची स्वारी आली. रखमाला तिथं बसलेलं पाहून मास्तर आश्चर्यचकित झालं.

मास्तर - " अगं तु अजून इथंच? मी आणून दिलं असतं कि घरी? "

रखमा - " न्हाई जी तुमास्नी कशापायी तरास. लई मेहेरबानी झाली मास्तर.

मास्तर - " चल बस बाईकवर घरी सोडतो तुला. सामानपण भरपूर आहे. चल बस लवकर. "

रखमा - " नगं नगं त्यापरीस तुमी व्हा म्होरं म्या येतु मागनं."

मास्तर बाईकनं रखमाच्या घराम्होरं येऊन पोहोचलं अन् मागनं रखमा आली बिगी बिगी.

रखमा - "मास्तर वाईच या कि गरीबाच्या झोपडीत. घ्वाटभर कोरी चाय घ्या.

रखमानं मास्तरांच्या हातातलं सामान घरात घेतलं. नवऱ्याला मास्तरला बसायला देण्यासाठी इशारा केला. तसं रखमाच्या नवऱ्यांनं गोणपाट पुढं करत मास्तरला बसायाला दिलं. रखमानं चुलीत लाकडं सारीत कोरी चाय केली. अन् मास्तरपुढं केली. चाय पिऊन झाल्याबरुबर मास्तर जायाला निंगालं तसं रखमानं त्यांना वाईच थांबायला सांगितलं. नवऱ्याला डोळ्यानं इश्शारा केला तसं त्यानं पोरांना घराबाह्यर नेलं अन् दरवाजा आडकुसा केला. मास्तरला कायबी कळना काय चाललय ते. मास्तर काही बोलायच्या आतच रखमानं खांद्यावरचा पदर खाली टाकला नी अंगावरली चोळीची हुकं एकएक करत खोलू लागली.

मास्तर - " ओ रखमाबाई हे काय करताय? अहो शोभतं का तुम्हाला हे?

रखमा - " मास्तर अवं तुमी केलेल्या उपकाराची परतफेड करतीया. "

मास्तर - " परतफेड आणि हि अशी? अहो पण मी कुठे म्हटलं कि मी केलेल्या उपकाराची मला परतफेड मला हवी म्हणून. मी जे काही केलं ते माणुसकीच्या नात्याने. "

रखमा - " मास्तर तुमचं बरोबर हायसा पर म्या तरी काय करनार? सवयच झाली हायसा मला याची. मांगच्या महिन्यात अशीच वरल्या वाडीत मदत मागायाला गेली हुती. कुनीबी मदत केली न्हाई. कुनी हाटाकलं तर कुनी अंगाशी झोंबाझोंबी केली. बराबर हाय त्यांचं बी म्हना. हतं स्वार्थ असल्यापरीस कोन कुनाला चाय बी पाजत नाय तथं पैसं तर लई मोठी चीज. सुरवातीला म्या ईरोध केला पर मंग ठरवलं इतके दिस जीवापाड जपलेली हि जवानीची दौलत दुसऱ्याच्या सवाधीन करन्यापरीस उपाव न्हाई. मागच्याच महिन्यात दोन तरणी पोरं आलती बाईकवरनं बसून, त्यांनी दिलं पैकं. शंभराच्या चारनोटा होत्या पर नोटा मांज्या हाती देन्याआधी माज्याकडचं व्हतं नव्हतं ते सारं लुटलं. तवापासनं म्याच ठरिवलं या पोरास्नी, नवऱ्याला, सासऱ्याला पोसायचं तर हि लाखमोलाची दवलत उधळावीच लागनार.

माजा नवरा ह्यो असा मुडदाड, व्यसनी, दुसऱ्याच्या शेतावर राबनारा. राबल्यावर जो काय पैकाअडका मिलायचा त्यो दारुच्या गुत्त्यावर उडवायचादारुमागं. म्हनून मग म्या लोकांच्या घरात धुनीभांडी कराया लागली. पर तथं बी लोकांच्या वंगाळ नजरा छळायच्या मला. मंग म्या तरी काय करनार. दुष्काल पडल्यापासनं काम बंद पडलं शेतावरचं अन् हे घरकाम बी.

तवापासनं हि उपासमारी सुरु झाली. दिसामागनं दिस उलटून चाललं व्हतं. मह्यनं उलाटलं. पोरं भुक भुक करत व्हती. म्या तरी काय करायला हवं होतं मास्तर तुमीच सांगा. "

मास्तर - " सारं सारं मान्य आहे मला पण हा काही एकमेव पर्याय नाही. तुला नोकरीच हवी ना तर मी देतो. तुझ्या नवऱ्याची दारु सोडवायला प्रयत्नही मीच करेन आणि तुझ्या पोरांचा शाळेचा खर्चही मीच करेन. पण हे असं वंगाळ काम तु करायचं नाहीस. सगळीच माणसं वाईट नसतात रखमा.

रखमा- "व्हय मास्तर लई उपकार झालं बघा तुमचं. मला माफी करा मास्तर म्या पुन्यांदा असं वंगाळ न्हाई करायची बघा. तुमच्या या उपकाराची म्यापरतफेड करनार मास्तर पर ती तुमी सांगितलेल्या मार्गानच.

## 4. राखणदार.

शंकऱ्या पडवीत कसलासा इच्चार विचार करीत बसला होता. त्याच्या पुढ्यात त्याच्या बारक्या पोरगा अन् पोरीनं भातुकलीचा खेळ मांडला होता. शंकऱ्याची बायको गौरा आत चुलीजवळ बसून भाकऱ्या बनवित होती न्याहारीसाठी. न्याहारी तयार झाल्याबरुबर गौरानं धन्याला आवाज दिला,

" धनी अवं धनी, या आत वाईच भाकरतुकडा खाऊन घ्या अन् मंग जावा कुठं जायचं तिकडं. " गौरानं दोनदा आवाज देऊन देखील बाहेर शंकऱ्याचं हुं कि चुं नाही. काय झालं बघायलागौरा हातातलं काम सोडून पदराला हात पुशीत घराम्होरल्या पडवीत आली. बघती तर शंकऱ्या हा असा गालावर हात धरून कुठल्याशा ईच्चारात गढलेला. तिला काय सुदीक कळंना म्हणूनशान तिनं खांद्याला हात लावत शंकऱ्याला भानावर आणला. तसा शंकऱ्या भीतभीतच भानावर आला.

गौरा - " अवं असं काय करुन ऱ्हायलासा? काय हुतय वाईच सांगाल का? म्या कंधीपासनं आवाज देऊन ऱ्हायली तुमास्नी. ध्यान तरी कुठं हाय म्हनावं "

शंकऱ्या - " ऱ्हाई काय ऱ्हाई. तु काय म्हनत हुतीस. "

गौरा- " अवं भाकर झालीया ती खाऊन घ्या गरम गरम. "

शंकऱ्या - "बरं बरं, तु वाढायला घे म्या आलो. "

शंकऱ्या उठला तशी पोरं बी त्याच्या मागं मागं सयंपाकघरात गेली. भाकरतुकडा खाऊन झाल्याबरुबर शंकऱ्यानं गौराला कांदा, मिरचिचा ठेचा अन् भाकर गुंडाळून द्यायला सांगितली. नेहमीपरमानं शंकऱ्या रातच्याला शेतातल्या घरावर राखणीसाठी जाणार व्हता.

दिस मावळतीला आला तसा शंकऱ्यानं देवघरात देवाम्होरं दिवाबत्ती केली.

देवाम्होरं हात जोडून तोंडातल्या तोंडात काहीसं पुटपुटला अन् अडगळीच्या खोलीत गेला. तिथनं चिमणी घेतलान, कमरेला कोयती खोचलान, खिशात विजेरी टाकलान, रातीसाठीगौरानं दिलेलं जेवण कापडात गुंडाळून घेतलं नी घराबाह्यर पडला तशी पोरं पायाशी घुटमळू लागली. बाबा आमास्नी पर शेतात न्या म्हनून. गौरानं डोळे वटारीत त्यांना मागं ओढलं. उंबऱ्याआडनंच डोईवर पदर घेत शंकऱ्याला तिनं निरोप दिला.

चिमणीच्या उजेडात रानातनं वाट काढीत शंकऱ्या चालला होता. मधीच एखादं पाखरु आवाज देई, मधीच पायाखालच्या पाचोळ्यातनं सळसळण्याचा आवाज येई. सावध होऊनशंकऱ्या तोंडानं सुंई सुंई करी, काठी आपटी अन् पुढं चालू लागे. शंकऱ्याचं शेत गावातल्या घरापासनं पाऊणतासभर लांब. हातातल्या काठीला कापडात गुंडाळलेलं जेवण बांधलं होतं. नी एका हातात चिमणी धरुन शंकऱ्या एकदाचा शेतघरात पोहोचला. चिमणी अंगणातल्या आकड्यावर टांगली. केरसुणीच्या झाडूने

अंगण झाडून घेतलं. झावळीपासनं बनवलेल्याझाडूने घर झाडलं. खांद्यावरची घोंगडी बाहेर अंगणातच पसरुन शंकऱ्या त्यावर बसला, कसलाचा ईच्चार करत. बाजूच्या आंब्याच्या झाडावर खारकुंडीनं आवाज केलान तसा भानावरयेत हातातल्या घड्याळात बघितलान. घड्याळात साडेआठ वाजले तसा घरात जाऊन त्याने कपड्यात गुंडाळलेलं जेवण सोडत जेवण उरकलान.

बाहेर अंगणात येऊन हात धुवीत चूळ भरलान. भवताली बऱ्यापैकी अंधार झाला होता.

शंकऱ्यानं घराचं दार लावलान, घोंगडी खांद्यावर घेतली, खिशातली विजेरी चपापली, कमरेला कोयती खोचली, गडूमधी पाणी घेतलं अन् शेतातल्या मचाणीवर जाऊन बसला. वेळभरभर सरत होती तशी शंकऱ्याची नजर हातातल्या घड्याळाकडे जाई. शेताच्या राखणीसाठी रोज रातीला शंकऱ्या शेतातल्या मचाणीवर येऊन बसत असे. रानडुक्कर, ससे, भेकरंरातच्याला शेतात

यायची. त्यांना पिटाळायला शंकऱ्याने शेतात बुजगावणं उभारलं होतं. तसा त्याचा शेतावरला गडी असायचा राखणीला पर दोन दिसापूर्वीच तो तालुक्याच्या गावी गेलाहोता त्याच्या आज्याच्या मैताला.

त्यामुळे आता गौरा अन् शंकऱ्या दोघं मिळून आळीपाळीनं शेतावर राखण करीत होते.

रातचे साडेबारा वाजले तसा शंकऱ्या आता सावध होऊन बसला. मचाणीवर अंगाभोवती घोंगडं गुंडाळून तो गपगुमान कुणाच्यातरी येण्याची वाट बघित बसला होता. आजूबाजूलाकुनीकुनीसुदिक न्हायी. शंकऱ्याचं शेत गावाबाहेर एका बाजूला रानाला लागून होतं. काळाकुट्ट अंधार मधीच सुं सुं करीत वाऱ्याचा झोत यायचा नी पिकं हलवायचा. नारळीच्या झावळ्याएकमेकिंवर आपटायच्या, शेतात मधीच कसलीशी सळसळ व्हायची तसा शंकऱ्याचा कुत्रा कान टवकारीत भुंकत सुटायचा त्या दिशेनं. रातकिड्याची किरकिर सुरु होतीच

इतक्यातनेहमीचा आवाज शंकऱ्याच्या कानावर पडला. घुंगरकाठी ठोकीत कुणीतरी शंकऱ्याच्या शेतातल्या घराभवती फेऱ्या मारत होतं. आवाज तर यायचा पर कुनीसुदीक दिसायचा न्हाई. शंकऱ्या हातातली विजेरी आवाजाच्या दिशेनं मारुन बघायचा पर कुनीसुदिक दृष्टीस पडायचं न्हाई. पहाटे कोंबडा आरवला कि तो आवाज बंद होई. पहाट होईस्तोवर हे असंच चालायचं. घुंगरकाठीचा आवाज रातभर शंकऱ्याच्या कानात घुमत असे. कुतरंबी त्याला काही झोपून देईना. भुंकून भुंकून त्यानंपण हैदोस मांडलेला. दोन दिस झाले तीन दिस झाले. रोजरातच्याला हे असंच चालू होतं. शंकऱ्याचे डोळे लालभडक झाले होते. दोन तीस दिस तासाभराचीपण झोप न्हाई. शंकऱ्या पार वैतागला होता. घरात सांगून सोय नव्हती. गौरालासांगितलं तर ती पुन्हा घाबरायची. शंकऱ्या शेतावरनं येई. रोजचे विधी पार पाडे पर फारसा कुनाशी बोलायचा न्हाई. त्याचं हे असं इपरीत वागणं गौराच्या ध्यानी आलं व्हतं. तिनं इच्चारलंपर शंकऱ्या तिला कसलीच भनक लागून देत नव्हता.

चौथा दिस उजाडला तसा चाय पिऊन शंकऱ्या तडक घरातनं निघाला. गावाबाहेरच्या टेपाडावरल्या भगताकडं. भुऱ्या भगत शेंदूर फासलेल्या दगडांसमोर धुनी पेटवून अंगाला राखफासून कसलासा मंतर पुटपुटीत बसला होता. धुनीजवळ मानवी कवटी अन् एका बाजूस मोराच्या पिसाचा झाडू पडला होता. " काय रं शंकऱ्या आज वाट कशी काय चुकलास? घरलासमदं बेस हाय न्हवं? भुऱ्या भगतानं इचारलान.

शंकऱ्या -" घरला समदं बेस हाय पर योक दुखनं हाय. शेतावरल्या घरापाशी. "

भुऱ्या भगत - " ते आनी काय? वाईच उलगडून सांगितलस तर कळल. "

शंकऱ्या - " आरं भगता रोज रातच्याला शेतावरल्या घराम्होरं कुनीतरी घुंगुरकाठी वाजवित फेऱ्या मारतं. आवाज करीत न्हाय तोंडानं, दिसत बी न्हाय, फकस्त घुंगुरकाठीचा आवाजतेवढा येतो. "

भुऱ्या भगत काय समजायचं ते समजून गेला. त्याने शंकऱ्याला ईचारलं. " आरं येड्या जागेवाला राखणदार हाय त्यो. तुज्या वाडवडलापासनं येत असणार त्यो. तुज्या वाडवडलांनीसांगितलं न्हाई काय तुला? आवसेला राखण द्यायला? "

शंकऱ्या - काहीसं आठवीत शंकऱ्या बोलला, " व्हय रं भगता. म्या पापी, चांडाळ इसरलो बघ. वाडवडलापासनं चालत आलेली रीत म्या मोडली. आता काय तरी उपाव सांग. "

भुऱ्या भगत - " फार काय करायला लागत न्हाय बघ. यक चांगलं कोंबडं तयार ठेव. अगरबत्ती, पानाचा ईडा, नारळ, सुपारी, हलद, कुकु हे समदं तयार ठेव. मी येतो अवसेच्या रातीघराजवळ. "

शंकऱ्या - " तु सांगशिला तसं करतो बघ. पर तु रातच्याला घरला नगं येऊस. मला थेट शेतावरल्या घराजवळ भेट. "

भुऱ्या भगत - " बरं आता जा मांज्या साधनेचा वगत झाला हाय. अवसेच्या राती भेटू. "

भुऱ्या भगतानं सांगितल्यापरमानं शंकऱ्यानं त्यादिवशी सगळी तयारी केलान. गौराकडनं जेवण बांधून घेतलान नी नेहमीपरमानं निघाला शेतावर. हातातलं सामान नी कोंबडं बघूनगौरानं ट्वाक काढलान. " हे वो काय आक्रित काढलसा? तुमी भगतगिरी चालू केलीव कि काय? यक नाय दहा प्रश्नं इचारुन भांडावून सोडलान तिनं शंकऱ्याला. आता तिच्यापासनंकायसुदीक लपवण्यात अर्थ नव्हता. शंकऱ्यानं तिला झाला परकार सांगितला. तशी ती शांत झाली. " तरीच तुमी इतके दिस गप गप हायसा, अवं मी कोन नाय का तुमची? हे डोरलंगळ्यात कशापायी बांधलसा?" असं म्हणत तिनं तोंडाचा पट्टा पुन्यांदा चालू केला.

शंकऱ्या गपगुमान घरातनं निघाला नी शेतावर जाऊन पोहोचला. नेहमीपरमानं त्याने घराची, अंगणाची साफसफाई केलान, जेवणाचा वगुत झाल्याबरुबर जेवून घेतलान नी भगताचीवाट बघित मचाणावर जाऊन बसला. घड्याळात अकराचा ठोका झाला तसा पाऊलवाटेवरनं पालापाचोळ्यातनं

झपझप पावलांचा आवाज शंकऱ्याच्या कानावर पडला. तसा शंकऱ्यासावध झाला. विजेरीचा झोत त्याने त्या पाऊलवाटेवर मारलान तसा भगत नंजरेस पडला. शंकऱ्याचा जीव त्याला पहाताच सुखावला. शंकऱ्या आता मचाणावरनं खाली उतरला. भगतापाशी जाऊन उभा ऱ्हायला. भगतानं सगळं सामान शंकऱ्याला पिशवीतनं बाह्यर काढायला सांगितलं. शंकऱ्या यक यक करीत सामान बाह्यर काढीत व्हता. भुऱ्या भगतानं सारंसामान येवस्थित घराच्या म्होरं दारासमोर मांडलं नी राखणदाराला आवताण धाडलं.

आवसेची रात होती. भवताली मिट्ट काळोख, सुं सुं करत वारा वाहात होता. वाऱ्याच्या झोतानं पिकांची अन झाडांची सळसळ सुरु होती. नारळिच्या झावळ्या एकमेकिंशी झोंबाझोंबीकरीत व्हत्या. मधीच कुत्र्यानं रडून बाजार मांडलान. शंकऱ्यानं एक काठी हानली त्याच्या पेकाटत. तसं ते कुई कुई कण्हत शांत बाजूस जाऊन बसलं. भुऱ्या भगतानं दोन्ही हात जोडूनशंकऱ्याला एक्याजागी उभं ऱ्हायला सांगितलं. भुऱ्या

भगतानं सवताभवती अन् शंकऱ्या भवती यक रिंगण वढलं हातातल्या राखेनं.

चारीदिशांना ती राख फुकित कसलासा मंतर पुटपुटीत व्हता त्यो.

भुऱ्या भगत- " शंकऱ्या कायसुदीक घाबरायचं कारण न्हई बघ. या रिंगणाबाह्यर अजाबात पडायाच न्हई. म्या सांगन तेवढंच करायाचं. "

शंकऱ्यानं मान डोलवली अन् भुऱ्या भगत राखणदाराला बोलावू लागला.

अर्ध्या पाऊण तासानं पुन्यांदा तोच घुंगुरकाठीचा आवाज शंकऱ्याच्या कानी पडला. तसं कुतरं बी सावध झालं. शंकऱ्यानं

कुतऱ्याला काठीनंच खुणावलं तसं त्ये बसल्या जागी गपगुमान. मावळतीच्या दिशेनं रानातनं झपझप पावलं टाकीत एक पांढरी फट्टक आकरुती घराच्या दिशेनं येताना शंकऱ्याच्या नंजरेस पडली. भुऱ्या भगतानं शंकऱ्याला सांगून ठेवलं व्हतं मीसांगितल्याबगर यक अकशरसुदीक तोंडातनं काढायाचा न्हई. आकरुती हळूहळू जवळ येऊ लागली अन् शंकऱ्याच्या दारात येऊन ऱ्हायली.

डोईवर गोल तांबड्या रंगाचा मुंडासा गुंडाळलेला, अंगात पांढराशुभ्र अंगरखा कमरेपतुर घातलेला. कमरेखाली पांढरं धोतर. पायात चांदीचा गलेगठ्ठ वळा. हातात पण चांदीचा वळवलेलाकडा. खांद्यावर जाड घोंगडी, पायात करकर आवाज करणाऱ्या वहाणा, हातात जाड घुंगुरकाठी, डोळे हे असे बटाट्यासारखे बाह्यर आलेले. पहाताच समोरचा पानी पानी व्हावा असे. डोळ्यांवर जाड पांढऱ्या भुवया, टोकदार नाक, मोठाले टोचलेले कान, पिळदार जाड्या पांढऱ्या मिश्या अन्

त्याआड दडलेले पान खाऊन लाल झाल्यागत ओठ, कानावरनं केस उतरुनदाढीला येऊन भिडलेले. असा समदा वेश.

भुऱ्या भगतानं त्याला पहाताक्षणीच आर्जव मांडलं, " रं मांज्या देवा राखणदारा ह्यो तुजा मान तुला आज आमी हथं देता हाव तो मान्य करुन घे. लेकराकडनं काय चुकला माकलाअसलं तर मोठ्या मनानं माफी कर. लेकरु अजाणतं हाय त्येचाकडनं चुक घडली हाय त्याबद्दल म्या तुजी माफी मांगतो. यक डाव माफ कर. त्येच्या घरदारावर, शेतावर, पिकदाण्यावर, पोराटोरांवर, घरधनीणीवर तुजी किरपादृष्टी अशीच बरकरार ठ्येव. ह्यो तुजा मान मी तुज्याम्होरं ठेवला हाय तो ग्वाड मानून घ्ये अन् लेकराला अजाबात तरास नको होऊन देऊस. "

येवढं बोलून भुऱ्या भगतानं कोंबडं पुढं केलान नी त्येला पानी पाजून कोयता त्येच्या मानेवर फिरवलान. फडफडत कोंबडं लांब

जाऊन निपचित होऊन पडलं. भुऱ्यानं तवर नारळ फोडूनपाच तुकडं करुन विड्यावर मांडून ठेवले. राखणदारानं त्याचा मान हसत स्वीकारला. हात वर करुन शंकऱ्याला आशीर्वाद दिला अन् आल्यापावली त्याची राखण घेऊन माघारी वळला.

शंकऱ्या आता निर्धास्त झाला व्हता. भुत्या भगतानं त्याला आता सगळं नीट समजावून सांगितलं. या म्होरं आता अवसेला नुसत्या नारळाची राखण दिलीस तरी चालल पर ती द्यायलाचुकूमाकू नगंस. कंदीतरी चार- पाच महिन्यातनं तुला वाटलंच तर येखादा कोंबडा दे राजीखुशीनं. भरुन पावल त्यो. किरपादृष्टि बरकरार राहिल त्याची तुज्या घरादारावर. एवढं बोलूनभुऱ्या भगत त्याची बिदागी घेऊन निगून गेला. अन् शंकऱ्या पहाट व्हताच आपल्या घरी परतला. रातीचा झाला परकार त्यानं गौराला सांगितला. गौरा पर आता खुश व्हती. धन्याच्याडोक्यावरलं संकाट टळलं व्हतं. शेतात चांगलं पिक आलं हुतं ते ईकून तालुक्याच्या बाजारात जाऊन शंकऱ्यानं पोराटोरांनां नविन कापडं खेळणी आणली. गौराला नवी

साडीचोळीआणली. शंकऱ्या पोराटोरांना खेळवित बसला होता पुढल्या अंगण्यात. इतक्यात पुन्यांदा त्योच घुंगुरकाठीचा आवाज. शंकऱ्यासमोर राखणदार उभा व्हता. शंकऱ्याकडं बघून हसलाअन् आल्या हात वर करुन आशीर्वाद देत निघून गेला.. ©चंदन विचारे.

---

## 5. बाळ -बाळंतीण (भयकथा)

घड्याळात संध्याकाळचे सात वाजले होते.

रॉकी बेडरुमच्या खिडकितून दर पाच- दहा मिनटांनी खाली वाकून पहात होता. मध्येच मोबाईलमधून कुणालातरी फोन ट्राय करत होता. फोनची रिंग सतत वाजत होती पण समोरुनकुणी कॉल रिसिव्ह करत नव्हतं. घड्याळाचे काटे जसजसे पुढे सरकत होते तसतशी रा◌ॅकीची चुळबुळ वाढत होती.

रॉकीने घड्याळात पाहिले पावणे आठ वाजले होते. तोंडातल्या तोंडात रॉकी कुणाच्यातरी नावाने शिव्या हासडत होता. इतक्यात बिल्डिंगखाली गाडीच्या हॉर्नचा आवाज आला. रॉकी धावतच खिडकिजवळ गेला. गाडी ओळखीची होती.

रॉकीने पटकन  हॉलमध्ये जाऊन फ्लॅटचा दरवाजा उघडला. एक एक करत रॉकीचे चार मित्र पटकन आत घरात  शिरले.

रॉकी - " किती वेळ लावता यार तुम्ही लोक. एवढा टाईम लागतो काय दारु आणायला?

किरण (रॉकीचा मित्र)- अरे यार या विनितच्या पायी सगळा लोचा झाला यार. त्याचा बाप भेटला ना मधेच. तो पण नेमका वाईन शॉपसमोरच कुणाशीतरी बोलत उभा होता. त्यात तोआम्हाला ओळखतो ना म्हणून मग तो तिथून निघेपर्यंत थांबावं लागलं यार.  बरं सॉरी चल पटापट सुरु करु. "

रॉकीच्या  मित्रांनी पिशव्यातनं आणलेला व्हिस्किचा खंबा, रम, चकण्याची पाकिटं, 'सिगरेटचं पाकिट सगळं पटापट बाहेर काढलं. रॉकीने किचनमधून काचेचे ग्लास धुऊन आणले. पार्टीचा माहौल आता मस्तपैकी बनला होता.

विनित (रॉकीचा मित्र ) - "अरे रॉकी वहिनी अचानक येणार नाय ना. नायतर अचानक धाड पडायची आणि आपली पंचाईत व्हायची. "

रॉकी - " अरे फिकर नॉट. ती काय आता चार- पाच दिवस तरी येत नाही बघ. पोरीला शाळेला ख्रिसमसची सुट्टी पडली आहे दहा दिवस. त्यामुळे आता इथे आपलंच राज चारपाच दिवसतरी. तु माझा पेग बनव चल पटपट आणि या बंटीला काय खायला आणलं कि नाही. नायतर तो बिच्चारा आपल्या तोंडाकडे बघतच

बसायचा. पीत नाही तर नाही  निदान चकणा तरीखायला दे त्याला मजबूत. "

हिवाळ्याचे दिवस असल्याने अंधार लवकरच पडत असे. थंडीसुद्धा कडाक्याची. आज हि सगळी मित्रांची भुतावळ रॉकीच्याच घरी नाईट मारणार होती. दारुचे पेग रिचवता रिचवतासगळ्यांच्या गप्पा, एकमेकांची खेचाखेची सुरु होती.

किरण - " अरे विनित तु त्यादिवशी बड्डे पार्टीला हॉटेलमध्ये सोबत घेऊन आलेला तिच्यासोबत काय सीन सुरु आहे सध्या. नाय म्हणजे लग्न बिग्न करणार आहेस कि खाली टिपी. "

विनित - " कुछ भी मत बोल यार आपण सिरीयस आहे एकदम. पुढच्या महिन्यात तिच्या घरी बॉंब टाकणार आहे लग्नाचा. बघू काय होतं ते. "

रॉकी - " आयला हा तर खूप फास्ट निघाला यार. "

बंटी- " हा ना, तिच्यामारी. वाटलं नव्हतं हा इतका सिरीयस वगैरे होईल म्हणून. "

काहीवेळानं रॉकीच्या लक्षात आलं कि, खंबा संपायला आलाय.

रॉकी - " अरे यार खंबा खाली  होत आला. तुझी रम संपली कि आहे बाकी  वीनित?

विनित - " अरे आहे अजून थोडी. मला फुरसतमध्ये मरायची सवय आहे. "

रॉकी -" हाफ क्वार्टर मागवायची का?

किरण - " हा मागव ना भाई. ये  बंटी माझी  बाईक घेऊन जा आणि एक हाफ क्वार्टर घेऊन ये  लवकर. निघ लवकर नायतर बंद होईल आणि येताना सिगरेटचं पाकिट पण घेऊन ये. "

बंटी - " एवढ्या रात्री मी एकटा नाय जाणार विनितला बोल सोबत चलायला. "

रॉकी - " अरे भो***च्या फाटली का? मांजरपाट साला. म्हणून बोलतो आमच्यासोबत रहात जा, थोडी पित जा मग भिती निघून जाईल. ये जा रे विनित याच्यासोबत लवकर. "

घड्याळात रात्रीचे पावणे अकरा वाजले होते. विनित आणि बंटी बाईकवरुन भरभर निघाले. नाक्यावरचं वाईन शॉप बंद झालं होतं म्हणून मग दोघे थोडं पुढे हायवेला आले आणितिथल्या एका वाईन शॉपमधून दोघांनी हाफ क्वार्टर घेतली आणि निघाले. वाटेत किरणच्या गर्लफ्रेंडचा फोन आला आणि मग किरण

रस्त्याच्या एका टोकाला बाईक लावतगर्लफ्रेंडसोबत फोनवर सुरु झाला. बंटी सारखा त्याला मधेमधे टोकत होता. त्यात किरण बाहेर मित्रांसोबत ड्रिंक करायला बसला हे कळल्यावर तिने भांडणच उकरुन काढलं. तिलासमजवता समजवता किरणची पार चढलेली उतरायला लागली होती.

बंटी - " भाई बारा वाजायला आले. रॉकी सारखा फोन करतोय चल ना जाऊ लवकर. एक तास व्हायला आला आपल्याला इकडे येऊन. ते दोघं शिव्या घालतायत. "

फोन कट करुन किरणने बाईकला किक मारली आणि दोघे निघाले. रस्त्यावर अजिबात वर्दळ नव्हती. निर्मनुष्य रस्ता आणि हे दोघे त्या निर्मनुष्य रस्त्यावरून बाईकवरुन सुसाट सुटलेहोते.

गाडी रॉकीच्या बिल्डींगपासून दहा बारा मिनटावर येऊन धक्के देत देत  अचानक थांबली.

बंटी - " काय रे बाईक काय झालं हिला? "

किरण - " बघतो थांब. टाकी तर फुल आहे. अचानक काय झालं हिला. "

तु एक काम कर मोबाईलचा टॉर्च चालू कर मी बघतो काय मिस्टेक आहे ते.  "

पाच-दहा मिनटं प्रयत्न करुन झाल्यावर किरण बंटीला बोलला, "धक्का मारत न्यावी लागेल, सकाळी बघू गॅरेजमध्ये नेऊन दाखववावी लागेल बहुतेक. "  बंटीने मान डोलवली आणि धक्कामारत मारत ते दोघे  रॉकीच्या बिल्डिंगच्या गल्लीत पोहोचले. रॉकीचं घर आता गल्लीच्या टोकावरुन जवळच होतं. बंटीने राॅकिचा सतत येणारा फोन उचलून त्याला बाईक बंद पडल्याचं सांगितलं. गल्लीजवळ आहोत येतो लगेच असं म्हणत बंटीने फोन ठेवला.

रस्त्याच्या  डाव्या बाजूस गच्च झाडी होती. आणि रस्त्याच्या उजव्या बाजूस एका मांत्रिकाचं घर.  तो बारका टप्पा पार केला कि पलीकडे  रॉकीची बिल्डिंग. बंटीने त्या मांत्रिकाबद्दल बरंचकाही ऐकलेलं असल्याने त्याची आता चांगलीच वाचा बसली होती. भितिने थरथरत तो बाईक  पटापट ढकलत पुढे नेत होता. त्याला आता कधी एकदा घरी पोहोचतोय असं झालेलं.

इतक्यात रस्त्याच्या डाव्या झाडीतनं कसलासा आवाज झाला तसे दोघेही दचकून थांबले. त्या झाडीत एक जुनाट पडका वाडा अन् त्यासमोर एक पडकी विहीर असल्याचं दिवसा बंटीने पाहिलं होतं आणि त्या समोरच्या मांत्रिकाकडे येणाऱ्या झपाटलेल्या बायाबाप्यांबद्दलही काहिबाही ऐकलं होतं. बंटीला दरदरुन घाम फुटला होता आणि तो किरणला पटपट पुढे पायटाकायला सांगत होता. किरण त्याला न घाबरण्याबद्दल सांगत होता. "भुतंबितं काय नसतात. " किरण बंटीला सांगत होता. किरण मात्र थरथरत्या अंगाने भवतालची चाहूल घेत बाईकला धक्का देत परत झपझप पावले टाकीत चालला होता. किरणने मोबाईलचा टॉर्च ऑन केला होता.

पुन्हा पलीकडल्या झाडीतून कुणाच्यातरी पैंजणांचा अन् बाळाच्या रडण्याचा आवाज. रस्त्याच्या डाव्या अंगाला बरंच रान माजलं होतं. आवाज तिथनंच येत होता. आता मात्र किरणहीपुरता घाबरला होता. हा असा निर्मनुष्य रस्ता, काळोखी रात्र,

घड्याळात रात्रीचे बारा वाजून गेलेले, बंटीने सांगितलेली गोष्ट अन् तो पैंजणांचा-बाळाच्या रडण्याचा आवाज.

किरण आता पाऊल पुढे टाकणार तोच डाव्या हाताच्या झाडीतनं समोरुन एक जुनाट मळकं पातळ नेसली बाई आली. केस मागे मोकळे सोडलेले, हातात हिरव्या बांगड्या, पायातपैंजण, चेहरा मात्र स्पष्ट दिसत नव्हता डोईवरनं पदर घेतल्याने.  तिच्या हातात काहीतरी गुंडाळलेलं होतं. समोर येताच तिने हातावरला गुंडाळलेला पदर बाजूस केला, रडण्यातिचाआवाज तिथूनच येत होता. तिच्या हातात कोवळं पोर होतं. नुकतंच जन्माला आलेलं. महिनाभरही झालेला नसावा. तिला पहाताच बंटीनं तोंड झाकून घेतलं नी तो काहीसा मागे झाला. किरण मात्र पुढे होऊन थोडं धीटाईने तिला बोलला, "कोण तुम्ही? एवढ्या भयाण रात्री इथं काय करताय आणि तेही या लहानग्या बाळाला घेऊन. "

ती बोलू लागली - "माझ्या बाळाला भूक लागली हाय जी. रडून रडून निसता घर डोक्यावर घेतला यानं. अंगावर दूध न्हाई. वाईच दूध मिळतंय का पहायला आली होती. तुमी यालाबघता का जरा मी तवर दूध बघते याच्यासाठी. "

किरण बोलला, " एवढ्या रात्री कुठे मिळणार दूध? दुकानं तर केव्हाचीच बंद झाली.  माझा मित्र येथे जवळच रहातो त्याच्याकडे बघतो असेल तर घेऊन येतो. "

पण तिने याला नकार दिला, " नगं मला ठावं हाय या वक्ताला कुणीकडं  दूध मिळेल ते. तुम्ही वाईच याला बघा तवर. "  किरणने मागे वळून बंटीकडे पाहिले. बंटीने भीतभीतच नकारार्थीमान डोलवली. पण किरणला कुठून दुर्बुद्धी सुचली कोण जाणे. किरणने तिच्या ओटीतलं मूल आपल्या हाती घेतलं

तशी ती बाई माघारी वळून  पुन्हा त्याच झाडीत शिरली. आता मात्रकिरण काहीसा बावचळला. त्याला काही कळेचना. जर हिला आल्या वाटेनं मागेच पुन्हा जायचं होतं तर हि येथे बाहेर आली कशाला. डोक्यात विचारांचा काहूर माजलेला असतानाच. डाव्या झाडीतनं धपकन् पाण्यात काहीतरी पडल्याचा आवाज झाला. किरणला काही कळेचना काय चाललय ते, आवाज कसला हे पहाण्यासाठी त्याने ते हातातलं मूल बंटीकडे सोपवूजाताच बंटी किंचाळला अन् बेशुद्ध पडला.

किरणने पुन्हा हातावर नजर टाकली तो हातात  केवळ बाळाचा सापळा. इतका वेळ धीटाईने वागणाऱ्या  किरणचीही आता पुरती  दातखिळ बसली होती. बंटीच्या ओरडण्याचा आवाजऐकून  रॉकी आणि विनित खाली धावत  आले होते. बंटी आणि किरणला धीर देत त्यांनी कसाबसा घरी आणला नी दोघांच्या तोंडावर पाणी मारत दोघांनाही शुद्धीवर आणले.

शुद्धीवर येताच बंटीने त्या दोघांना घडला प्रकार सांगितला. रॉकीने दोघांनाही नीट समजावून बेडरुममध्ये झोपवले. दुसऱ्या दिवशी पहाट होताच आंघोळ्या आटपून त्यांनी त्यामांत्रिकाचे घर गाठले. घडला प्रकार मांत्रिकाला सांगितला. मांत्रिकाने मागच्याच अमावस्येला एका नुकत्याच बाळंतीण झालेल्या पण बाळंतीण झाल्यानंतर अवघ्या दहा दिवसातचअशक्तपणामुळे बाळ गमावालेल्या अन् त्या बाळामागे हाय खाऊन मेलेल्या बाईची हकिगत सांगितली. तिचा दादला येऊन तिला बांधण्याविषयी सांगून गेला होता. मांत्रिकाने त्याचविहीरीत त्या दोघांची भूतं मंत्राने बांधून सोडून दिली होती. ती अशी आमावस्या - पौर्णिमेला बाहेर पडत. काल रात्री तुम्ही पाहिलेली हिच ती बाई असं मांत्रिकाने सांगितलं अन् त्यावरकायमस्वरुपी उपाय करण्याचे कबूल केले. "काहीतरी राहून गेलं असावं बहुतेक मांत्रिक पुटपुटला. मी करतो बंदोबस्त पुन्हा असं व्हायचं नाही". तेव्हा कुठं हि पोरं माघारी आपआपल्याघरांकडे वळली रात्रीचा तो भयानक थरार अनुभव सोबत घेऊन.. ©चंदन विचारे.

---

## 6. एका लग्नाची गोष्ट - भाग १

१ जुलै २०१९ ची संध्याकाळ.

त्या दिवशी भरपूर  पाऊस होता.

तिने ऑफिसातून निघाल्यावर ट्रेनमध्ये असतानाच त्याला फोन केला.

ती - " हॅलौ, मी काव्या बोलतेय. आज दादरला भेटायचं  का आपण?  मला माहिती आहे पाऊस खूप आहे पण तरीही. खरंतर मला आज मला पावसात भिजावसं वाटतंय.

तो एव्हाना त्याच्या घराजवळच्या रेल्वे स्थानकात येऊन पोहोचला होता. पण तिचा फोन येताच अन् तिने भेटीची इच्छा व्यक्त करताच तो मागेफिरला. नेमका आज भरपूर पाऊस

असूनही लोकल वेळेवर होत्या. थोड्याच अवधीत तो दादर स्थानकाबाहेर पोहोचला.

त्याला काव्याचं स्थळ एका ओळखीच्या मध्यस्थामार्फत आलेलं. पत्रिका जुळतील न जुळतील पण मनं, मतं, स्वभाव जुळणे महत्त्वाचे असे त्याचेठाम मत आणि म्हणूनच तो तिला भेटीसाठी आळवत होता. तीचं म्हणणं अगदी याऊलट. जोवर घरच्यांसमोर आपली पसंती होत नाही तोवर भेटायचंनाही. पण आज का कुणास ठाऊक तिला त्याच्या भेटीची ओढ लागली होती. सोबतीला तिच्या आवडीचा पाऊसही होता.

ती दिसायला अगदी साधी, सरळ, सालस. तो मात्र दुनियादारीची पुरती  जाण असलेला. नक्षत्र मा◌ॅलजवळ छत्रीत उभी ती त्याची वाट पहात होती. त्यानेही तिला फारशी वाट पहायला लावली नाही. समोरासमोर येताच दोघांची नजरभेट झाली. चेहऱ्यावर हलकेच स्मित उमटलं दोघांच्याही.

तो - " फार वेळ वाट पहावी लागली नाही ना?

ती - " नाही मी दहा मिनटांपूर्वीच पोहोचले इथे. "

तो - " बरं मग निघायचं?

ती - " कुठे जायचं?

तो - " माझ्या माहितीतलं एक छानसं मराठमोळं उपहारगृह आहे इथे जवळच. थोडंसं चालावं लागेल चालेल ना?

ती - " हो काही हरकत नाही. "

उपहारगृहाजवळ पोहोचताक्षणीच त्याच्या लक्षात आलं. आज सोमवार. उपहारगृह बंद असतं. तिला भेटण्याच्या उत्सुकतेत तो ते विसरुनच गेलाहोता.

तो - " अरे यार, सा़ॅरी माझ्या लक्षातच आलं नाही आज सोमवार ते. सोड आपण दुसरीकडे जाऊ. "

ती -" हं चालेल. "

नक्षत्र माॅल ते जिप्सी उपहारगृह तो भराभर चालत होता. ती मात्र तिच्या चालीने. त्याला ते जाणवलं तसा त्यानेही त्याच्या नेहमीच्या चालीत बदल केलाअन् तिच्या सोबतीने चालू लागला. मधेमधे थोड्याफार गप्पा सुरुच होत्या. अखेर दोघंही जिप्सीमध्ये विसावले.

तिने सँडविचची ऑर्डर दिली. सोबत त्याच्यासाठी आणलेली भेटसुद्धा दिली. तो मात्र तिला भेटण्याच्या नादात तिच्यासाठी काहीतरी भेट घेण्यासविसरलाच. टेबलावर बसल्या बसल्या सँडविच खात खाता दोघांमधे बऱ्याचशा गप्पा झाल्या. एकमेकांना जाणून घेण्याचा प्रयत्न झाला.

त्या  गप्पा कमी कि काय म्हणून  तिथनं बिल देऊन दोघेही त्याच्या आवडत्या ठिकाणी नारळी बागेत गेले. पावसाची रिमझिम सुरुच होती. पुन्हा तिथेबसून गप्पा टप्पा.

ती - " अहो ऐका ना, आजच्या आपल्या या भेटीविषयी आपल्या घरच्यांना प्लीज काही कळू देऊ नका नाहीतर आपण त्यांना विचारात न घेता भेटलोअसा समज करुन घेतील ते अन् रागे भरतील ते. "

तो " don't worry. हे बघ या भेटीमागचा आपला हेतू अगदी शुद्ध आणि प्रामाणिक होता. एकमेकांना जाणून घेणं हाच. तो साध्य झाला आणितसं काही झालंच तर मी बोलेन तुझ्या घरच्यांशी. समजावून सांगेन त्यांना. तू अगदी निर्धास्त रहा. "

ती - "बरं. "

बागेतनं निघताना पहिल्या भेटीची आठवण म्हणून दोघांनीही  छत्रीत ( एका नव्हे, आपआपल्या) छानसा सेल्फि काढला.

मनं, मतं, स्वभाव आता जुळू लागले  होते.

अजून बरंच काही जाणून घेणं बाकी होतं आणि त्यासाठी अजून बऱ्याचशा फोनवरच्या गप्पा आणि भेटीगाठी बाकी होत्या.

तशा त्या होणारच होत्या. पण पहिली भेट मात्र छान झाली. त्याच्या आवडत्या ठिकाणी. तिच्या आवडीच्या पावसात. त्याला भेटण्याची, त्याला जाणूनघेण्याची ओढ, हूरहूर, पावसात भिजण्याची हौस सारं सारं भागलं होतं. तिच्यासारखीच त्याचीही.

मग जवळच्याच एका छोट्याशा हॉटेलात गरमागरम चहा घेऊन, एकमेकांचा निरोप घेऊन, पहिल्या भेटीची आठवण

मनात साठवून, हृदयाच्याकुठल्याशा फांदिवर नुकतीच उमललेली प्रेमाची कळी अलवारपणे जपत दोघेही आता आपआपल्या घराकडे रवाना झाले.

आता पुढे काय होणार याची ओढ तुम्हाला लागली आहे ना !

मलाही लागली आहे.. ©चंदन विचारे.

क्रमशः

# 6 एका लग्नाची गोष्ट भाग २.

दोन्हीकडच्या मंडळींनी ठरविल्याप्रमाणे मुलीच्या घराजवळच्या एका उपहारगृहात दोन्हीकडचे मध्यस्थ आणि मुलामुलीसहित घरची मंडळी आली होती.

चहा पिता पिता औपचारिक बोलणी झाली.

मुलामुलीची आणि घरच्यांची पसंती झाली.

मुलाकडच्या मंडळींनी मुलीकडच्या मंडळींना लागलीच होकार कळवला होता पण तरीही विचार करण्यासाठी दोन दिवसांचा अधिक वेळ दिला.

या दोन दिवसात त्या दोन जीवांची जाम घालमेल सुरु होती. तसे ते वरचेवर भेटत आणि फोनवर बोलत होते.

पुढे काय होणार कसं होणार याची काळजी दोघांनाही लागली होती. मात्र या दरम्यान मुलगा मुलगी दोघंही नकळतपणे अरेंज मॅरेज दरम्यानची मजा अनुभवत होते.

दोन दिवसांनी मध्यस्थामार्फत मुलीकडच्यांचा ऑफिशिअल होकार  आला. मुलाचा तसा पत्रिका - कुंडली यावर विश्वास नव्हता पण घरच्यांच्या मर्जीचा मान ठेवणं भाग होते. मुलाचे वडीलज्योतिषाकडे पत्रिका घेऊन पहायला गेले. ज्या दिवशी ते पत्रिका घेऊन गेले त्यादिवशी दोघही जाम टेंशनमध्ये. ऑफिसातनं  निघताना मुलाने वडीलांना फोन केला. मुलाच्या वडीलांनी स्वभावाप्रमाणेउडवाउडवीची उत्तरे दिली.

" तु आधी घरी ये मग बोलू"  हे ऐकून तर मुलाची पार बोबडीच वळली. आता अजून पुढे काय वाढून ठेवलय याचा विचार करत तो घरच्या दिशेने एक एक पाऊल टाकत होता. त्याच्याप्रमाणेच कायहोतय याची काळजी तिलाही लागून राहिलेली. त्या विचारात त्यादिवशी ती तशी जेवलीच नाही आणि

तोही. अर्थात प्रश्न दोघांच्याही भविष्याचा होता. घरच्यांच्या मानाचा, मर्जीचा होता. पण काव्याने अन्त्याने ठरविले होते पोझिटिव विचार करायचा म्हणजे निगेटिव विचारांचा शिरकावच होत नाही मनात.

नाही नाही म्हणताना गोष्टीत इथे ट्विस्ट येऊ पहात होता.

पण मुलगा आपल्या निर्णयावर ठाम होता. खरंतर अशावेळी मुलामुलीचं आपल्या घेतलेल्या निर्णयावर ठाम रहाणं महत्त्वाचं. मी याआधी म्हणालो होतो त्याप्रमाणे जिथे मनं मतं स्वभाव जुळलेलेअसतात तिथे या इतर गोष्टी फारशा प्रभावी ठरत नाहीत.

घरी पोहोचताच जेवणं आटोपल्यावर वडिलांनी मुलाला ज्योतिषाने सुचविलेले विधी करावयास सांगितले. मुलाने वडीलांकडून पत्रिका घेत दुसऱ्या दिवशी पुन्हा त्याच ज्योतिषास

गाठले. पत्रिका अगदीउत्तम जुळत होती. मुलामुलीसाठी सुचविलेले विधी दोघांनीही याआधीच पार पाडले होते. मनासोबतच आता पत्रिकादेखील जुळली होती. मुलाने काव्याला आणि दोन्हीकडच्या घरी लगोलग हि गोडबातमी कळवली. नातेवाईकांना निरोप पोचते होऊ लागले.

खरंतर लग्न हे दोन जीवांचं मिलन दोन कुटुंबांचं मिलन असं आपण नेहमीच म्हणत असतो  पण ते ठरवत असताना आपण त्या दोघांच्या मतांना फारसं विचारात घेतच नाही. आपलीच मतं आपल्याचरिती परंपरा त्यांच्यावर लादत असतो. अर्थात त्या चांगल्या असतील तर त्यांची जपणूक करण्यास काहीच हरकत नाही. मतं मांडायला जरुर हवीत पण ती लादू नये. म्हणजे पूर्वी तसं व्हायचं पण आताकाळ बदललाय.

काळानुसार आपण अंगावरची कापडं बदलली मग विचारसरणी तीच जुनी का?

कथेतल्या नायकाने त्याची  मतं काव्याला अन् तिच्या - त्याच्या  घरच्यांना पटवून दिली होती.

आता वेळ होती पुढची बोलणी आणि कांदापोह्याच्या औपचारिक कार्यक्रमाची.. ©चंदन विचारे.

# 6. एका लग्नाची गोष्ट - भाग ३.

पत्रिका जुळल्याने दोन्हीकडची मंडळी आता अगदी खुशीत होती. गोष्टीत मधेच एक ट्विस्ट आल्याने आता दोहीबाजुंना अजून पुढे काही वावगंघडायला नको होतं. दोन्ही कुटुंबातल्या ज्येष्ठ मंडळींची फोनवर बोलणी झाली आणि मग एके दिवशी मुलाच्या घरी बसून साखरपुडा आणि लग्नाचीबोलणी, देवाणघेवाण यासांबंधी बोलायचे ठरले.

ठरल्यादिवशी ठरल्यावेळी मुलीकडची मंडळी मुलाच्या घरी आली. त्यांच्या स्वागताची यथायोग्य तयारी मुलाकडच्यांनीही केली होती.

मुलीकडच्या मंडळींनी मुलाचे घर नीट पाहून घेतले. चहापाणी झाले आणि देण्याघेण्यासंबंधीची बोलणीही. अगदी खेळीमेळीत सगळं पार पडलं.

साखरपुड्याची आणि लग्नाची तारीख बसल्या जागी दोन्हीकडच्या मंडळींनी ठरवून टाकली.

सारं कसं मनाजोगतं घडत होतं. ऑगस्ट महिन्याच्या २५ तारखेला दोन्ही कुटुंबियांच्या, नातलगांच्या, मित्रमंडळींच्या साक्षीने काव्या आणि चंदनचासाखरपुडा पार पडला. आणि डिसेंबरमध्ये लग्नही. दोघांच्याही घरच्यांना आता कुठे या सगळ्यातून सुटल्यासारखं झालं. गेली कित्येक वर्षे दोन्हीबाजूंच्या ज्येष्ठ मंडळींची आपापल्या मुलामुलींची लग्न जुळवण्यासाठीची धडपड आता थांबली होती. विविध विवाह संस्थांकडे घातलेल्या खेपा, वेगवेगळ्या नातेवाईकांकडे लग्न जुळविण्यासाठी वर्षानुवर्षे केलेली आर्जवं, आणि मुलांचं वाढत चाललेलं वय हे टेंशन, सारं सारं थांबलं होतं.

चंदन आणि काव्या हे नवविवाहित जोडपं आता अगदी खुशीत होतं. लग्न झाल्यानंतर देवदर्शन, सत्यनारायणाची पूजा, हळद उतरणी, पाचपरतावन हे हि सोपस्कार पार पडले. दिवस पटपट सरत होते. एके दिवशी मोबाईलमध्ये फेसबुकवर चंदनला एक नोटिफिकेशन आलं. काव्या आणिचंदनच्या फेसबुकवरील मैत्रीला एक वर्ष पूर्ण झाले होते.

चंदनच्या डोळ्यासमोर पुन्हा सगळा फ्लॅशबॅक तरळू लागला. वर्षभरापूर्वी याच डिसेंबर महिन्यात आजच्याच दिवशी चंदनला काव्याची फेसबुकवरफ्रेंड रिक्वेस्ट आली होती. चंदनने ती स्वीकारण्याआधी काव्याला रिक्वेस्ट पाठ्वण्यामागचं कारण विचारलं. तिने लागलीच तुमचे स्थळ एकामध्यस्थामार्फत आल्याचे सांगितले. तिलाही त्याला जाणून घ्यायचं होतं म्हणून तिने हा पर्याय स्वीकारला.

त्यानंतर व्हॉट्सअपवर पत्रिका मिळाल्याचा मेसेज. दोघांचे वरचेवर एकमेकांशी व्हाटसऍपवर बोलणे होऊ लागले. चंदनने तिला प्रत्यक्ष भेटण्याविषयीसुचवले पण तीने मात्र याला ठाम नकार दिला. जोवर पत्रिका जुळत नाही आणि घरच्यांसमोर आपली समोरासमोर भेट किंवा बघण्याचा कार्यक्रम होतनाही तोवर भेटायचं नाहीच. ती तिच्या जागी बरोबर होती पण चंदनला मात्र तिला भेटून जाणून घ्यायचे होते.

एके दिवशी व्हॉट्सअपवर तिचा पत्रिका जुळत नसल्याचा मेसेज आला. चंदन तसा पत्रिका वगैरे यावर फारसा विश्वास न ठेवणारा, दैवापेक्षा कर्मांलामहत्त्व देणारा. तिच्या नकाराच्या

मेसेजला त्याने होकाराचा रिप्लाय दिला. तो म्हणाला पत्रिका जुळत नसेलही पण एकदा प्रत्यक्ष भेटून मनं जुळतायतका ते पाहू. पण ती मात्र तिच्या घरच्यांच्या निर्णयावर ठाम. पत्रिका जुळत नाही म्हटल्यावर भेटीचा प्रश्नच येत नाही अन् मला माझ्या घरच्यांच्यामर्जीच्या/निर्णयाच्या विरोधात जायचं नाही असा तिचा हेका. तसं तिचं म्हणणंही एका अर्थाने बरोबर होतं.

नकार मिळाला पण आम्ही दोघांनी व्हॉट्सअप-फेसबूकवरची मैत्री अशीच जपायचं असं ठरवलं. प्रत्यक्ष भेट नाहीच पण अधेमधे व्हॉट्सअपवर बोलणंव्हायचं. त्यात ती फेसबूकवर असल्याने चंदनच्या चालत असलेल्या सोशल एक्टिव्हिटिज आणि लिखाणावरुन तिलाही त्याच्या स्वभावाचा बऱ्यापैकीअंदाज येत होता. त्याच्या सोशल एक्टिव्हिटिज, त्याचं लिखाण हळूहळू तिच्या पसंतीस उतरत होतं. मधल्या काळात त्याने बरेचदा तिला भेटीसाठीकन्व्हेन्स करण्याचा प्रयत्न केला पण तो तिने फोल ठरवला.

काही महिन्यानंतर एका कार्यक्रमादरम्यान त्या मध्यस्थांची पुन्हा चंदनच्या घरच्यांशी भेट झाली. चंदनच्या वडीलांनी त्यांना

त्याचे लग्नजुळविण्याविषयी सुचवलं. घरी गेल्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा त्या मुलीच्या घरच्यांना चंदनविषयी सुचवलं. मुलीकडच्यांनी पुन्हा दुसऱ्या ज्योतिषाकडेपत्रिका पहायचं ठरवलं आणि अखेर तो गोड मेसेज व्हॉट्सअपवर आलाच. पत्रिका चांगल्या गुणांनी जुळतेय. पुढे जायला हरकत नाही. आम्हीसुद्धादोन ज्योतिषांना दाखवून खात्री करुन घेतली आहे.

योगायोगच म्हणायला हवा खरंतर. डिसेंबर २०१८ साली पत्रिका जुळत नसल्याने मोडलेलं काव्या आणि चंदनचं लग्न त्याच डिसेंबर महिन्यात २०१९साली पार पडलं..

खरंच म्हणतात कि लग्नाच्या गाठी या तो, जो वर आकाशात बसलेला असतो ना तो ठरवतो. जोवर त्याचा ग्रीन सिग्नल भेटत नाही तोवर काहिच घडतनाही. योग यावा लागतो. ©चंदन विचारे.

---

## 7. श्वास हा तुझा.

संध्याकाळचे सात वाजले होते. बाहेर पावसाने मिट्ट अंधार केला होता. अधनंमधनं वीजांचा कडकडाट.

सोसाट्याचा वारा दिमतीला घेऊन तो आला.

मास्तरांनी द्वाड खट्याळ मुलांना वेताची छडी हाती घेऊन झोडपावं तशीच त्याने आल्या आल्या सार्यांचीच झोडपणी सुरु केली.

श्रीरंग हे सारं  बाल्कनीतनं पहात होता. पाऊस ऐन रंगात आलेला पाहून त्यानेही त्यात भर घालायचं ठरवलं.

बेडरुममधल्या झुंबरचे लाईट्स डीम केले. होम थिएटरवर आशा भोसले आणि अदनान सामीचं "भिगी भिगी रातों में" लावलं. किचनमध्ये गॅसवर कॉफी बनवायला ठेवली.  मग गरमागरम कडककॉफिचा मग हाती घेऊन तो परत बेडरुमच्या

बाल्कनीत आला आणि पावसासहित गाण्याची मजा लुटत बसला. आत आणि बाहेर दोन्हीकडे मस्त माहौल बनला होता. अशावेळी तिची आठवण येणंसहाजिकच. श्रीरंगचं लक्ष घड्याळाकडे गेलं. घड्याळात साडेसात वाजून गेले होते. श्रीने सईला फोन लावला पण सईचा फोन सतत नाॅट रिचेबल. दहा बारा वेळा प्रयत्न करुन झाले. कुठे अडकली तरनसेल ना पावसात सई?

श्रीला  आता सईची काळजी वाटू लागली होती.

इतक्यात समोरनं एका अनोळखी क्रमांकावरुन श्रीच्या मोबाईलवर फोन आला. त्याने तो लागलीच उचलला.

सई- ' हॅलो श्री, मी सई बोलतेय.

श्री - ' अगं तु आहेस कुठे? आणि तुझा फोन सारखा नाॅट रिचेबल येतोय. मी ट्राय करत होतो सतत. '

सई- ' हो अरे रेंजच दाखवत नाही आहे. मला वाटलंच तु फोन करत असशील म्हणून मग शांभवीच्या मोबाईलवरनं म्हटलं तुला फोन करुया. बरं मी निघतेय आता ऑफिसमधून. '

श्री - ' स्टेशनजवळ  आलीस कि कळव मी गाडी घेऊन येतो तुला पिक अप करायला. '

सई - ' बरं. '

सई श्रीची सहचारिणी. दोघांचं नुकतंच लग्न झालं होतं. सहा महिने झाले असतील.

सईने घाटकोपर स्टेशनवरनं लोकल सुटल्यावर श्रीला फोन केला तसा श्री घरातून निघाला. सई स्टेशनबाहेर छत्रीत श्रीची वाट पहात उभी होती. ट्रॅफिक असल्याने श्रीला जरासा उशीर झाला. श्रीनेगाडीचा हॉर्न दिला तशी सई धावत पळत येऊन गाडीत शिरली. छत्री बंद करुन गाडीत शिरेपर्यंतच्या थोडक्याच क्षणांत पावसाने तिला भिजवण्याची थोडी थोडकी संधी काही सोडली नाही.

सईच्या काळ्याभोर केसातनं पावसाच्या पाण्याचे थेंब कपाळावरुन, बटेवरुन गालांवर, ओठांवर ओघळत होते.

श्री थेंबांचं ओघळणं एकटक पहात होता. मागनं गाड्यांची हॉर्न बोंबाबोंब सुरु होती. सईने चेहऱ्यावरचे थेंब साडीच्या पदराने पुसत श्रीला भानावर आणलं.

सई - ' श्री ! अरे असा काय बघतोयस? गाडी सुरु कर ना. लोकं हॉर्न मारतायत. '

श्रीने भानावर येत गाडी सुरु केली. गाडीत पुन्हा पावसाची गाणी. बाहेर पाऊस सुरुच होता. मधेच काहीतरी आठवताच श्रीने गाडी रस्त्याच्या कडेला लावली. एका कोपऱ्यात पत्र्याच्या शेडखाली एककोवळी पोर तिच्याआईसमवेत गजरे विणत बसली होती. श्री ने तिच्याकडून मोगऱ्याचा गजरा घेतला अन् तो निघाला.

सई - ' काय रे कुठे गेला होतास आणि गाडी का अशी मधेच थांबवलीस. '

श्री - ' काही नाही एक वस्तू घ्यायची राहिली होती. ती घेतली. '

सई - 'बरं मग आता निघायचं?

रात्रीचे नऊ वाजले होते. श्रीने ओळखीच्या एका उपहारगृहाजवळ गाडी थांबवली.

श्री - ' सई चल उतर पटकन, आज इथेच जेऊ मस्त गरमागरम.

सई - ' अरे वा आज स्वारी भलतीच खुश दिसतेय. ' पाऊस आणि तू भलताच रंगात आलायस. दोघांनीही चिंब भिजवायचं ठरवलय का मला आज?

श्री - ' ते सगळं जेवताना बोलू तु उतर आधी. '

श्रीने सईच्या आवडीची डीश ऑर्डर केली. जेवता जेवता छानपैकी गप्पाही झाल्या. बिल चुकतं करुन दोघेही आता घरच्या वाटेने निघाले.

घरात शिरताच सई बाथरुममधे चेंज करायला गेली तसं श्रीने खिशातला गजरा काढून  बेडरुममधे उशाखाली नेऊन ठेवला. बेडरुममधे एअर फ्रेशनर मारला.

बेडच्या मखमली चादरीवर  मोगऱ्याची सुटी फुलं पसरवली. पुन्हा बेडरुममधल्या  झुंबरचा उजेड मंद केला. एसी ऑन करुन पुन्हा होम थिएटरवर ' श्वास हा तुझा आहे ओठी आज ह्या' गाणं लावलं अन्सईची वाट पहात बसला.

गुलाबी रंगाची नाईटी घालून, भिजलेल्या केसांनी सई बेडरुममधे आली. श्रीची नजर आता मात्र काही केल्या तिच्यावरनं हटायला तयार नव्हती. तीला बेडवर बसायचा इशारा करुन श्रीने उशाखालीदडवलेला मोगऱ्याचा गजरा हलकेच तिच्या केसांत माळला. फ्रेशनर आणि मोगऱ्याचा दरवळ आता

बेडरुमभर दरवळत होता. झुंबराच्या मंद उजेडाखाली सईचा गोरा देह अजून उजळून दिसत होता.

बाहेर मुसळधार कोसळणारा पाऊस, बेडरूममधला एसीचा गारवा, मोगऱ्याचा दरवळ, श्रीने होम थिएटरवर लावलेलं रोमेंटिक गाणं, सईचा मादक देह सारं सारं सुखावणारं, बेधुंद प्रणयाला आमंत्रणदेणारं..

दोघांच्याही देहाखाली मोगऱ्याच्या कळ्या आता चुरगळू लागल्या होत्या..

बेडवरच्या चादरिला हलके हलके सुरकुत्या पडू लागल्या होत्या..

होम थिएटरवरचे रोमेंटीक गाणे प्रणयात अजूनच रंग ओतत होते.. ©चंदन विचारे.

---

# 8. बाबा.

" बाबा मी येते " असं सांगून स्नेहा खांद्याला बॅग लावून ऑफिसला जायला निघाली. ती थोडी पुढे गेली असेल तोच काही तरी विसरल्याची जाणीव तिला झाली अन् ती पुन्हा  मागे फिरली.

स्नेहा - " बाबा मी संध्याकाळी ऑफिसमधून निघाली कि तुम्हाला फोन करेन. आपण आज बाहेरच जाऊ जेवायला. माझ्या ऑफिसजवळ एक छानसं चायनीज रेस्टाॅरंट आहे आपण तिथे जाऊजेवायला. आणि हो घाई करु नका सांभाळून सावकाशीनं या. "

बाबा - " बरं ठिक आहे. तू निघण्याआधी  कळव म्हणजे मी इथलं आवरुन निघेन. "

घड्याळात संध्याकाळचे साडेसहा वाजले होते. स्नेहाने लागलीच बाबांना फोन करुन निघायला सांगितलं.

साधारण सातच्या सुमारास स्नेहा ऑफिसमधून निघाली. स्टेशनजवळच्या बाजारातून तिने दुसऱ्या दिवसासाठी भाजी वगैरे खरेदी केली  आणि ठरलेल्या रेस्टाॅरंटजवळ जाऊन बाबांच्या येण्याची वाटपहात उभी राहिली.

थोड्याच वेळात एक रिक्षा रेस्टाॅरंटसमोर येऊन थांबली. बाबा रिक्षातून उतरताच पुढे होत स्नेहाने रिक्षावाल्याला भाडं देऊन मोकळं केलं.

बाबा - " अगं काय गरज होती माझ्याकडे आहेत पैसे. मी दिले असते कि. "

स्नेहा - " राहू दे. तुम्ही चला आत. "

दोघेही कोपऱ्यातल्या एका टेबलावर जाऊन बसले. स्नेहाने स्टार्टरमधे नेहमीचं मनचाऊ सूप ऑर्डर केलं. मेन कोर्सला उशीर नको म्हणून त्याचीही ऑर्डर लागलीच दिली. काही मिनटांतच वेटरने सूपदोघांसमोर आणून ठेवलं.

बाबा - " बरं आतातरी सांगशील का हे असं आज बाहेर जेवण्याचा बेत ठरविण्यामागचा उद्देश काय ते?

स्नेहा - " हो हो सांगते, आधी सूप तर प्या.  ते पिता पिता बोलू. "

बाबा - " बरं पितो, तू सांग काय सांगायचय ते. "

स्नेहा - " बाबा  माझ्या ऑफिसमधे एक मुलगा आहे. त्याचं माझ्यावर खूप प्रेम आहे. त्याने मला नुकतंच काही  दिवसांपूर्वी प्रपोज केलं होतं पण मी त्याला लागलीच माझा होकार नाही कळवला. तशीमी त्याला वर्षभरापासून ओळखते. तो आमच्याच ऑफिसमधे काम करतो. मॅनेजर आहे. सुरुवातीला आमच्यात फक्त जुजबी ओळख होती मग त्या ओळखीचं रुपांतर मैत्रीत आणि आता प्रेमातझालंय.

गेले दोन तीन दिवस मी याच विचारात होते कि तुम्हाला कसं सांगावं पण आज ठरवलंच तुम्हांला सांगायचंच म्हणून. आणि ते तसं नसतं केलं तर माझंच मन मला खात राहिलं असतं. खरंतर बाबाआपल्या दोघांतलं नातं हे बाप लेकिचं नाही तर मित्रत्वाचं आहे. मला त्या नात्याचा अपमान करायचा नव्हता आणि म्हणूनच मी ठरवलं कि तुम्हाला आधी सांगायचं. बाबा मला कळत नाहीयं मी कायकरावं ते. आता या क्षणाला मी अशा अवस्थेत येऊन पोहोचली आहे कि  माझ्या मनात त्याच्याविषयी प्रेमही आहे अन् मला तुम्हा दोघांनाही दुखवायचं नाही आहे. त्याचसाठी मी ठरवलं कि सर्वात आधीतुम्हाला सांगायचं आणि तुमचा निर्णय झाल्यानंतरच त्याला काय ते त्याला  कळवायचं. मी माझा होकार किंवा नकार अजून त्याला कळवलेला नाही. फक्त एवढंच सांगेन कि गेल्या काही महिन्यांत मीत्याला नीट पारखलंय. त्याच्याविषयी त्याच्या घरच्यांविषयी जमेल तेवढी माहित करुन घेतलं आणि मगच... "

बाबा - "नाव काय मुलाचं, कुठे रहातो, घरी कोण कोण असतं त्याच्या?

स्नेहा - " बाबा त्याचं नाव सागर विश्वासराव. रहायला परळला आहे. घरी आईवडील असतात. एक बहिण आहे आणि तिचं लग्न झालंय. त्याचा स्वतःचा फ्लॅट आहे परळला. गावीही घर वगैरे आहे. "

बाबा - " बरं... मग कधी भेटवतेस त्याला?

स्नेहा - " बाबा म्हणजे तुमचा होकार आहे? बाबा मला खात्री होती कि तुम्ही नाही म्हणणार नाही

बाबा - " हो हो पण  हे बघ पोरी मी उगाच विरोधाला विरोध करणाऱ्यांपैकी नाही आहे हे तुलाही चांगलंच ठाऊक आहे. आणि तसाही मला तुझ्या निवडीवर, निर्णयावर पुर्ण विश्वास आहे. मला खात्रीआहे तुझी निवड हि योग्यच असेल. तुझा स्वभाव मला पुरता ठाऊक आहे. घाईगडबडीत निर्णय घेऊन मोकळं होणाऱ्यांपैकी तु नाहीस. अगं बाजारात साधी भाजी घेताना तू ती नीट निवडून, पारखूनघेतेस तर मग आयुष्यातील हा महत्त्वाचा निर्णयसुद्धा तू

नीट विचार करुनच घेतला असशील याविषयी तीळमात्रही शंका नाही.

पोरी खरंतर तु मला हि गोष्ट विश्वासात घेऊन सांगितलीस याचा मला या क्षणाला जास्त अभिमान वाटतोय. तू प्रेमात पडल्यानंतर वा आकंठ बुडाल्यानंतरहि हि गोष्ट मला सांगू शकली असतीस पण तूतसं केलं नाहीस. मैत्रीच्या नात्यातून प्रेमाच्या नात्यात पाऊल टाकण्यापूर्वी तुला मला हे सांगावंसं वाटणं यातच सारं काही  आलं.

पोरी तू आता लग्नाच्या वयात आली आहेस तेव्हा जरा जपून. आमच्या विश्वासाला, आमच्या संस्काराला तडा जाईल असं तू आजवर वागली नाहीस. पण तरीही बाप म्हणून माझं एक सांगणं आहे, एक बाप म्हणून मला किंवा तुझ्या आईला,  आम्हा दोघांना तुझी काळजी वाटणं सहाजिक आहे. खरंतर वयात आलेली पोर म्हणजे आईबापाच्या जीवाला घोर असं म्हणतात.

काहीअंशी ते खरंही आहे पण पोरी मी बऱ्याच ठिकाणी बऱ्याच घटनांमधे असं पाहिलंय कि या अशा नाजूक नात्यात

पडल्यानंतर आईवडीलांना कळविण्याची कुठलीच तसदी न घेता सरळ पळून जाऊनलग्न करुन मुलंमुली मोकळी होतात. घरचं वातावरण मोकळं असेल  तर ठीक नाहीतर त्यांच्याकडेही तोच पर्याय शिल्लक असतो. अर्थात मोकळीक म्हणजे स्वैराचार नव्हे हे हि ध्यानी असू द्यावं. खरंतर तसा दोष आईवडीलांनाही देता यायचा नाही कारण योग्य वेळी मुलांनीच आईवडीलांना विश्वासात घेऊन सगळं सांगितलं, पटवून दिलं तर मग नकाराचा प्रश्नच येत नाही अर्थात त्यासाठी  दोघांचीही निवड तितकिच योग्य असायला हवी. जेणेकरुन गोष्टी पटवून देताना आईवडीलांच्या मनात किंतूपरंतू येणार वा रहाणार नाही. बाकी सगळा कर्माचा नी नशिबाचा भाग.

काही प्रसंगी आईवडील टोकाची भुमिका घेतात यामागेही काहीअंशी मुलंच जास्त जबाबदार असतात. गोष्टी बाहेरुन कळण्यापेक्षा  जर त्या आपल्या मुलांकडूनच कळाल्या तर पुढेमागे नातेवाईक, समाज, शेजारीपाजारी यांना तोंड वा उत्तर देताना आईवडीलांच्या तोंडाला फेस यायचा नाही किंबहुना आपल्या मुलांनी गोष्टी बाहेरुन कळण्याआधी / कुणी खिजवून सांगण्याआधीच आपल्या कानावरघातल्या याचाच मग जास्त

अभिमान वाटतो त्यांना अन् मग ते अशाप्रसंगी मुलांच्या पाठीशी उभे राहून त्यांची बाजू ठामपणे मांडू शकतात. याचा विचार मुलांनीपण करायला हवा. आम्हा पालकांचंम्हणशील तर तुम्हा मुलांची निवड योग्य असेल याची चाचपणी करुन त्यांना सपोर्ट करायला हवा. उगाच विरोधाला विरोध नसावा. घरात धाकदपटशाहीने वागण्यापरीस जर प्रेमाने, विश्वासाने सारं साध्यहोत असेल तर असे प्रसंग उद्भवणारच नाहीत.

वयात आलेल्या मुलांशी पालक म्हणून नव्हे त्यांच्या जवळचे, हक्काचे मित्र म्हणून वागायला हवं अर्थात यात दोहोंना काही निर्बंध हे पाळायलाच हवेत. मर्यादेचं उल्लंघन नसावं. पूर्वीचा जमाना गेला. काळानुसार आता मोठ्यांचे विचार आणि विचार करण्याची पद्धत दोहोंत बदल झालाय.

पोरी आईबापांचा पोरांवर धाक हा असायलाच हवा पण तो चांगल्या गोष्टींसाठी. अर्थात प्रत्येक आईवडिल आपल्या मुलीसाठी स्थळ निवडताना हाच विचार करतात कि आपल्या लाडात, संस्कारातवाढलेल्या मुलीला तिच्या सासरचं घराणं चांगलंच मिळायला हवं. तिचा होणारा नवरा हा तिची काळजी

घेणारा, तिच्या सुखासाठी धडपडणारा, तिच्या मनीचं गूज जाणून घेणारा, तिच्या चांगल्यागोष्टींत तिला प्रोत्साहन देणारा, वेळप्रसंगी तिला धीर देणारा तिच्यामागे खंबीरपणे उभा रहाणारा असावा. माहेरच्यांकडनं लाभलेली मायेची ऊब तो प्रेमाचा ओलावा ते सुख तिला सासरकडच्यांकडूनदेखीला मिळो हिच अपेक्षा असते त्यांची. थोडक्यात काय तर दिल्या घरी आपली लेक सुखासुखी नांदो हिच काय ती अपेक्षा. बाकी जात, गरीब श्रीमंत हे असले भेद आम्ही पाळत नाही हे तुलाहीठाऊक आहेच. तुझा होणारा नवरा जर खरंच सगळ्यांत बसणारा असेल तर मग आमच्या नकाराचा प्रश्न येतोच कुठे? अर्थात या सगळ्याची चाचपणी तू केली असशीलच. "

स्नेहा - " बाबा तुम्ही खरंच खूप ग्रेट आहात. म्हणूनच मला तुम्ही नुसते बाबा म्हणून नाही तर एक जवळचे हक्काचे मित्रही म्हणुनही आवडता. आईचं काय तिला कसं समजवायचं?

बाबा - " जसं मला सांगितलंस तसंच तिलाही विश्वासात घेऊन सगळं सांग. बाकी तिला काय अन् कसं समजवायचं ते माझ्याकडे राहिलं. ती गावाहून परत आली कि बोलू आपण तिच्याशी. ठिक आहे? चल बराच वेळ झाला आता निघू. तुलाही उद्या ऑफिस आहे आणि मलाही बरीच कामं. मी आहे तुझ्या पाठीशी. Go ahead..

स्नेहा - Thank you so much बाबा.. ©चंदन विचारे.

---

## 9. लागीर.

९० दिचा काळ. एका गावातली कातरवेळ होती ती..

राऊळाच्या सभागृहात गावभर हुंडारुन आलेला नंदी पाय दुमडून, तोंडातल्या तोंडात काहीतरी रवंथ करीत निवांत बसला होता.

आत गर्भगृहातला शंभूमहादेव भटजीबुवांकडनं साग्रसंगीत सेवा पुरवून घेत होता. त्याच्या डोईवर ताम्रकलशातनं जलाभिषेक निरंतर सुरु होता. भटजीबुवांनी महादेवाच्या अंगाला यथेच्छ भस्म फासलं, भाळी चंदनाने त्रिपुंड रेखाटलं नी त्यावर मधोमध बेलाचं पान लावलं. डोईवर गोंड्याचं फुल. गळ्यातला नागोबा मधनंच डुलक्या काढत होता. जणू त्यालाही झोप आली असावी.

कर्पूरगौरं करुणावतारं म्हणत भटजीबुवांनी पूजेला सुरुवात केली. अगरबत्ती अन् धूप कापराच्या धुरानं महादेवाचा गाभारा जणू धुक्यात न्हात होता. त्या धुक्यात निरांजनातला पिवळसर दिवा नीमहादेवाचं निळकंठ रुप अगदी खुलून दिसत होता.

महादेवाच्या राऊळातलं वातावरण कसं अगदी मन प्रसन्न अन् मंत्रमुग्ध करणारं. कुणाचीही समाधी सहज  लागावी इतकं शांत. मधनंच एखाद दुसरा घंटेचा टणत्कार त्या शांत वातावरणात राऊळात सुरुअसलेल्या भाविकांचा फेर्यांची जाणीव करुन देत होता.

जवळच्या पिंपळाच्या पाराखाली दोनचार म्हातारी लेकिसुनांच्या, घरातल्या गप्पागोष्टीत रंगली होती.

भटजीबुवांच्या राऊळाशेजारील खोपटीतनं  धुर येताना दिसत होता सोबत चुलीवरल्या स्वयंपाकाचा घमघमाट..

वाऱ्याची गार  झुळूक अधनंमधनं आपल्या अस्तित्वाची जाणीव करुन देत होती. तिच्या येण्याने नारळीपोफळीच्या झावळ्या एकमेकांशी झोंबाझोंबी करीत होत्या. त्यांची सळसळ अन् राऊळामागनंवहाणाऱ्या नदीतल्या पाण्याचा खळखळाट त्या शांत - प्रसन्न वातावरणावर सोनेरी साज चढवित होता जणू.

इतक्यात कुठूनशी पैंजणांची छुमछुम ऐकू आली.

गोऱ्या पान देहाची, भाळी चंद्रकोर लावलेली, मध्यम बांध्याची ती.. गुलाबी साडी नेसून, लांबसडक केसांचा अंबाडा बांधून अन् त्या अंबाड्याची शोभा वाढवणारा मोगऱ्याचा गजरा त्यात माळूनमहादेवाच्या दर्शनाला आली. तिचा एरव्ही तेजाने उजळलेला चेहरा आज काहीसा धीरगंभीर वाटत होता. आल्या आल्या तिनेही घंटानाद करत गाभाऱ्यातल्या महादेवाची लागलेली तंद्री किंचितशी भंगकेली. डोळे मिटत ओठातल्या ओठात काहीतरी पुटपुटत दोन मिनटं ती तिथेच हात जोडून उभी.

अन् मग ओंजळीतली फुलं भटजीबुवांच्या हाती सुपूर्द करुन ती पायर्यांवर जाऊन बसली. पारावरली म्हातारी एकमेकांचा निरोप घेऊन जेवायला आपआपल्या घराकडं निघाली होती. भटजीबुवांनीहीमहादेवाला निजण्यासाठी शेज अंथरली अन् राऊळाचं दार मिटून ते ही घराकडे निघाले.

मीरेला पायरीवर बसलेली पाहून ते क्षणभर तेथेच थांबले. ' पोरी बराच उशीर झाला तू अजून येथेच बैसली आहेस. या वेळी हे असं बरं नाही दिसत. जा पाहू घराकडे लवकर. घरचे काळजी करतअसतील. '

' हो निघतेच थोड्या वेळात ' असं म्हणून तिने भटजीबुवांना घराकडे परतवलं अन् पुन्हा एका वाटेवर डोळे लावून बसली. इतक्यात नंदेश आला. अंगावर पांढराशुभ्र सुती कुर्ता, खाली पांढराच लेंगा, डोळ्यांवर चष्मा. त्याला आलेलं पाहून तिच्या गोऱ्या गालावरची कळी हलकेच खुलली. एकमेकांकडे पहात दोघांनीही नजरभेट घेतली नी तो पायताणं झटदिशी बाजूला सारुन राऊळात गेला. बंद दारा आडल्या महादेवाला न जागवताच त्याने नमस्कार केला. ' चल लवकर निघायला हवं कुणी येण्याआधी ' असं म्हणत तो अन् ती पायऱ्या उतरुन रावळामागच्या वाटेनं चालू लागले. नंदेशला मधेच थांबवून मीरेनं विचारलं, ' तुझा निर्णय पक्का आहे ना?

नंदेश तिच्या डोळ्यात डोळे घालून तिचा हात घट्ट धरुन नजरेनेच हो म्हणाला.

नंदेश गावातल्या प्राथमिक जिल्हा परिषदेच्या शाळेत दोन वर्षापूर्वीच शिक्षक म्हणून रुजू झालेला. घरचे घाटावरच रहायला अन् हा इथे नोकरीसाठी कोकणात. वय सत्ताविशीच्या आसपासचं. मीरा पंचविशीतली लावण्यवती तरुणी. वडील शेतकरी आणि आई गृहिणी. मीरेशी त्याची एकदा याच महादेवाच्या देवळात गाठ पडली. बेलाफुलाची पडावी तशीच. पहाताक्षणी तो मीरेच्या प्रेमात पडला. थोड्याच दिवसांत जुजबी ओळख अन् मग ओळखीचं रुपांतर प्रेमात. सुरुवातीचे काही दिवस चांगले गेले अन् मग एके दिवशी गावात बोंब उठलीच दोघांच्या प्रेमाची. गावच ते. बातमी रानातल्यावणव्यासारखी गावभर पसरली. मग काय तोच हिंदि चित्रपटातल्यासारखा विरोध तिच्या त्याच्या घरच्यांकडनं. जात नाही म्हणतात ती जात आडवी आली. एव्हाना दोघंही एकमेकांच्या प्रेमात आकंठबुडालेले. दोघांनाही पिरतीचं लागीर झालेलं. पण घरच्यांच्या विरोधापुढे कुणाचं काहिच चालत नव्हतं. मनात आणलं असतं तर दोघांनाही पळून जाऊन लग्न लावता आलं असतं पण त्यानंतर होणारीघरच्यांची बदनामी दोघांनाही नको होती. आणि म्हणूनच मग ते या निर्णयापर्यंत येऊन पोहोचले होते.

चालता चालता दोघंही नदीच्या काठावर येऊन पोहोचले. श्रावण महिना सुरु होता. नदी दुथडी भरून, खळाळून वहात होती. आभाळातल्या चांदण्यांच्या प्रतिबिंबाने नदीचं पाणी जास्तच लखाखत होतं. वारा आता कुठल्यातरी झाडाखाली विसावला होता बहुतेक. मघाच्या प्रसन्न वातावरणाची जागा आता गंभीरतेने घेतली होती. नदीच्या खळखळाटाखेरीज भवताली नीरव शांतता. रातकिड्यांचीकिरकिर रातीची जाणीव करुन द्यायला होतीच. मीरा, नंदेश म्हणत दोघांनीही एकमेकांकडे पाहिलं. दोघांच्याही डोळ्यात अश्रू दाटले होते. त्यांना वाट मोकळी करुन देत दोघेही एकमेकांना बिलगले. घट्टमिठी अन् धप्प् करत नदीच्या पाण्यात एक आवाज..

नुकताच झाडाखाली विसावलेला वारा पुन्हा घोंघावत वाहू लागला. झाडांची सळसळ पुन्हा सुरु. नदीच्या त्या खळाळत्या प्रवाहावरनं एकमेकांना बिलगलेले देह वाहत जाताना दिसत होते. मिठी किंचित सुटलेली पण हात मात्र हातचे सुटले नव्हते...
©चंदन विचारे. (सहज सुचलेलं)

---

## 10. क्षण आठवांच्या कुपीतले.

हिवाळ्याने आता चांगलाच जोर धरला होता. आपले गुलाबी रंग दाखवायला एव्हाना त्याने सुरुवात केली होती.

हवेत छान गारवा होता. अंगअंग शहारे आणणारा, देहाला सुखावणारा.

राहुल आणि राधिका दोघेही लग्नानंतर मधुचंद्रासाठी(हनीमून) #महाबळेश्वरला आले होते. नुकतंच दोघांचा घरच्यांच्या मर्जीने ठरवून विवाह झालाहोता. राहुल एका केमिकल कंपनीत आकाऊंटंट होता आणि राधिका एका प्रायव्हेट कंपनीत एच. आर.

महाबळेश्वरमधली आजच्या पॅकेजमधली प्रेक्षणीय स्थळं पाहून झाल्यानंतर ते दोघेही आता सनसेट पॉईंटवर आले होते सूर्यास्त पहायला. तिथेयेण्यापूर्वी वेण्णा लेकला दोघांनीही बोटिंग आणि घोडेस्वारी केली होती. नजरेसमोर खाली खोल दरी. हिरव्यागार डोंगररांगा अन् त्या डोंगराआडनंखोल खोल दऱ्यांचा, खळखळत वहाणाऱ्या नदीचा, हिरव्या गार डोंगरांचा, रानातल्या किलबिलणाऱ्या पाखरांचा, साऱ्या सजीव सृष्टीचा निरोप

घेऊनपश्चिमेकडे जाणारा नारंगी-पिवळ्या रंगाचा लोभसवाणा सूर्य. तो निघाला होता दुसऱ्या दिवशी परत सोनेरी किरणांची प्रभावळ घेऊन उगवण्यासाठी. तो जायला निघाला तशी थव्याने पाखरंही निघाली आपल्या घरट्याकडे घराच्या ओढीनं, झाडांच्या फांद्यांवरल्या घरट्यात रात्रभर विसावण्यासाठी. इतरजोडप्यांप्रमाणेच राहुल आणि राधिकानेही तो क्षण आपल्या कॅमेऱ्यात कैद केला. मावळत्या सूर्यासोबत अँगल बदलत बदलत बरेच सेल्फीही घेतले. तोक्षणच इतका लोभसवाणा, मोहमयी होता कि ते क्षण कुणालाही टिपावेसे वाटतील.

राधिका- " अहो ऐका ना, किती छान वाटतंय ना हे सगळं. असं वाटतं इथून उठून जाऊच नये, इथेच बसून रहावं. हि गारेगार हवा, हा सूर्यास्त, हानिसर्ग सगळं साठवून, कैद करुन ठेवायचंय नजरेत, मनाच्या कुपीत. तुम्हाला काय वाटतंय या क्षणाला?

राहुल - " मलाही आता या क्षणी असंच वाटतंय. उद्या मुंबईला गेल्यावर आपण दोघंही आपल्या घरच्या, ऑफिसच्या रुटीनमध्ये व्यस्त होऊन जाऊ. घड्याळातल्या काट्यासवे धावत

जाऊ नेहमीची ठरलेली लोकल आणि बस पकडण्यासाठी. मग हा असा निवांतपणा क्वचितच मिळेल तिथे आपल्यादोघांना".

राधिका - " हो ना ! किती भरभर निघून गेले तीन दिवस काही कळलंच नाही. कित्ती भटकलो ना आपण? मी इतकं कधीच भटकली नव्हती. आयमीन ऑफिशिअल पिकनिक, शाळा कॉलेजातल्या पिकनिकला गेलेली पण एवढी भटकंती नारे बाबा, कधीच नाही. पण या भटकंतीतली एक खासगोष्ट म्हणजे तुमची सोबत, तुमची साथ, तुमचा माझ्या हाती असलेला हात, तुमची सुखावणारी मिठी, आपण एकमेकांसोबत व्यतीत केलेली वेळ हेगोड गोजिरे क्षण, आपण मारलेल्या भरपूर गप्पा. सारं सारं सुखावणारं आहे.

राहुल - " तुझ्याइतकेच हे क्षण माझ्यासाठीही महत्त्वाचे आहेत राधिका.

गेली कित्येक वर्षे याच क्षणांसाठी आसुसलेलो होतो मी आणि तु ही कदाचित्. हो ना ! कैक गोष्टी साठवून ठेवलेल्या मी हि या हृदयात, तुलासांगण्यासाठी. आता असं वाटतय थांबूच नये.

बोलतच रहावं. काही जुनं काही नवं तुला सांगत रहावं. अर्थात तु बोअर होणार नसशील तर.

राधिका - " छे हो. मी का बोअर होईन. खूप छान वाटतंय उलट तुमच्या सोबत. असं वाटतं इतकी वर्षे मी पाहिलेली वाट आज खऱ्या अर्थाने चालतीबोलती झाली. तुमच्यासारखा समजूतदार, मनमोकळेपणाने बोलणारा, मला समजून घेणारा, माझी काळजी घेणारा जोडीदार मला लाभला. खरंच खूपछान वाटतय ".

राहुल - " मग थांबायचं कि निघायचं. " नाही म्हणजे काळोख पडण्याआधी निघायला हवं. मार्केटमध्ये खरेदीपण करायची आहे. आपल्या दोघांसाठी, घरच्यांसाठी. "

सनसेट पॉईंटवरनं पाहिलेला सूर्यास्त नजरेत साठवून, भरल्या मनाने दोघेही आता टॅक्सीत बसून हॉटेलकडे निघाली. गाडीत बसताक्षणी राहुलनेटॅक्सीचालकाला गाडी मार्केटमध्ये थांबवायला सांगितली. हवेतला गारवा आता अधिकच वाढला होता. राहुलने डोक्यात मंकि कॅप घातली अन् स्वेटरघातला.

राधिकानेही अंगभर शाल ओढून घेतली होती. राधिका अलगदच येऊन राहुलच्या मिठीत विसावली. त्याच्या मिठीतली उब तिला थंडीपासनंथोडा उसासा देणारी होती.

टॅक्सी मार्केटमध्ये येऊन थांबली. दोघेही टॅक्सीतून पायउतार झाले. मार्केटमध्ये बरीच गर्दी होती.

राधिका - " आपण सकाळी जाताना आपल्या बसच्या पिकअप पॉईंटजवळनं स्ट्रॉबेरी  घेऊ म्हणजे ताजी ताजी मिळतील. रात्री घेऊन ठेवली तर पुन्हानरम पडतील. बाकीच्या गोष्टी घेऊ आताच. ते मॅप्रोचं क्रश सिरप घ्यायचं राहून गेलं काल, मॅप्रो गार्डनमधनं. इथे मार्केटमधे त्यांचं आऊटलेट आहेतिथूनच घेऊ केसर आणि स्ट्रॉबेरी  फ्लेवर".

राहुल - " हो ठीक आहे ". तुलाही काही हवे असेल तर बघ आवडीचं घेऊ आपण. इथली आठवण म्हणून".

राधिका - " तुम्हाला घ्या ना काहीतरी छानसं, आवाडीचं".

राहुल - " नाही, नको. इथे तसं पहायला गेलं तर मार्केटमधे माझ्या आवडिचं काहीच नाही. पण मी इथनं आपण तीन दिवस सोबत व्यतीत केलेल्या, अनुभवलेल्या, जगलेल्या असंख्य आठवणी घेऊन जाणार आहे. माझ्यासाठी या आठवणींची शिदोरीच पुरेशी आहे". हवे तेव्हा ती शिदोरी उघडून मीया सुखद आठवणींची चव मनसोक्त चाखणार आहे".

साठवून ठेवणार आहे या आठवणी हृदयाच्या कुपीत अत्तरासारख्या. म्हणजे मग मला हवे तेव्हा ती कुपी उघडून त्यातल्या सुगंधित आठवणींच्यासहाय्याने मन सुगंधित करता येईल. अत्तरासम सुगंधी आठवणी.

राधिका - " किती छान बोलता हो तुम्ही. तुम्ही बोलायला लागलात कि किती सुंदर शब्द ओसंडून वाहू लागतात तुमच्या तोंडातून. नुसतं ऐकत आणिपहात रहावसं वाटतं एकटक तुमच्याकडे, तुमच्या डोळ्यांत. मी नजर हटवू नये अन् तुम्ही बोलणं थांबवू नये. हरवून जायला होतं. भान हरपून जातं. भवतालच्या जगाचा, गोंधळाचा विसर पडायला लागतो. कसली जादू आहे ना या शब्दांत ! "

राहुल - " हो खरंच की, बघ ना आपण बोलता बोलता हॉटेलवर पोहोचलो पण. अंतराचा पत्ताच लागला नाही". तू लवकर फ्रेश हो म्हणजे मग आपणजेवून लगेच रुमवर परत येऊ. आज आपली इथली शेवटची रात्र आहे ती हि जगून घेऊ पुरेपूर".

- ©चंदन विचारे.

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्षं. चंदन विचारे यांचं ई साहित्यचं हे तिसरं पुस्तक.**

यापुर्वीची त्यांची दोनही पुस्तके वाचकांना आवडली. चंदनजी एक मुक्त आणि Positive विचारांचे लेखक. आडनावाप्रमाणेच ते विचारशील चिंतनशील असे आहेत. ते अगदी सहज हळुवार लिहितात. कसलेच अवडंबर नाही. त्यांची शैली नव्या तरूण मुलांच्या हृदयाला स्पर्श करणारी आहे. आणि त्यांच्या लेखणीत सातत्य आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि सर्वदूर कानाकोपऱ्यातल्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. याच आमच्या प्रेरणा आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे,

अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?
सुनीळ सामंत
टीम ई साहित्य प्रतिष्ठान